

# गांधीप्रणित अभियांत्रिकी हाच प्रगतीचा मूलाधार



- डॉ. रघुनाथ माशेलकर

गेल्या मे महिन्यात कॅनबेरातील 'ऑस्ट्रेलियन ॲकॅडमी' ने मला सन्मान्य फेलोशिप प्रदान केली. या संस्थेतर्फे गेल्या चाळीस वर्षांत सन्मानित झालेला मी पहिला भारतीय. हा सन्मान प्रदान करतांना तेथील संचालकांनी मला ॲकॅडमीचे 'प्रेस्टीज इन्नोव्हेशन लेक्चर' देण्याची विनंती केली. त्या व्याख्यानास ऑस्ट्रेलियाचे विज्ञान व तंत्रज्ञानमंत्री कॅर यांच्यासह अन्य अनेक मान्यताप्राप्त संस्थांचे पदाधिकारी, वरिष्ठ अधिकारी, उद्योगपती व व्यापार जगताचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या व्याख्यानात भारतीयत्वाचा विशेष गंध असलेला पण सद्यास्थितीशी सुसंगत असा काही वेगळा विचार मांडायचे मी आधीपासूनच योजले होते. परंतु नेमके काय बोलायचे याबद्दल मात्र मनात संभ्रम होता. अखेर बऱ्याच विचारामंथनानंतर 'गांधी ते गांधीप्रणित अभियांत्रिकी' (गांधी टु गांधीयन इंजिनिअरींग) हा विषय सुचला आणि मग ऑस्ट्रेलियन ॲकॅडमीतील मान्यवरांसमोर मी त्याचीच मांडणी केली. विशेष म्हणजे याच विषयावर मी आधी पुण्याच्या 'टिळक स्मारक मंदिरात' युवा विद्यार्थ्यांच्या एका गटासमोर व्याख्यान दिले होते. तेथे ''मी भारतीय शोधकता: गांधीप्रणित अभियांत्रिकीकडे'' असा विषय घेतला होता. त्याची मांडणी करतांना मी प्रथम शोधकतेची व्याख्या विशद केली. शोधकता म्हणजे काही वेगळी कृती करून अशक्य ते शक्य करून दाखविणे. महात्मा गांधीजींनी नेमके हेच केले. प्रबळ ब्रिटीश साम्राज्याविरोधात भारतीय जनमत संघटीत करून त्यांनी देशास स्वातंत्र्य मिळवून दिले. सर्वथा अशक्यप्राय वाटणारी ही महान कामगिरी बजावतांना त्यांनी अनेक वेगवेगळी तंत्रे वापरली आणि 'अहिंसा' व 'स्वदेशी' या शस्त्रांच्या मदतीने अशक्य ते शक्य करून दाखविले. गांधींजींचे हे उदाहरण समोर असतांनाही आपण मंडळी मात्र आपली पारंपारिक विचारधारा बदलण्यास फारसे कधीच तयार नसतो. 'जगावेगळे काही करण्यात मोठा धोका आहे' – 'आपला हा वेगळा प्रयत्न फसला तर?' असे काही वेगळे करणे शक्यच नाही का? आत्तापर्यंत तसे कोणी केलेले नाही. यापूर्वी असा प्रयत्न कोणीतरी केला आहे. हे व या प्रकारचे नकारात्मक विचार आपल्याला नेहमीच नवे काही करण्यापासून रोखत असतात. परंतु गांधींजीसारख्या महान विभुती मात्र सतत नाविन्याच्या, कल्पकतेच्या शोधात असतात आणि त्यामुळेच त्यांच्या हातून मोठमोठी, अशक्यप्राय वाटणारी कामे अगदी सहजी होऊन जातात, ही मंडळी एखाद्या छोट्या, नव्या कल्पनेचे रूपांतर असाधारण संधीत करतात. कोणत्याही प्रश्नाकडे ते पाहातात ते प्रगतीची संधी म्हणूनच ! त्यांच्याकडे सिंहावलोकनाची शक्ती असते, अंतर्मनाचा आवाज जाणण्याची कुवत असते आणि दूरदृष्टीही असते. त्याच्या बळावरच ते मोठमोठी आव्हाने लिलया पेलतात आणि इतरांच्या दृष्टीने काहीच महत्व नसलेल्या साध्या साध्या विषयांतही मोठा आशय शोधुन प्रचंड कामे करून दाखवितात. 'भारतीय पोलाद उद्योगाचे जनक' जमशेदजी टाटा ही नेमकी याच प्रकारची असाधारण व्यक्ती होती. विसाव्या शतकाच्या प्रारंभी त्यांनी आपल्या पोलादउद्योगाची मुहूर्तमेढ रोवली तेव्हा ते अनेकांच्या कुचेष्टा व उपहासाचा विषय ठरले होते. सर फ्रेडरिक अपकॉट यांच्यासारख्या पाश्चात्य जाणत्यांची मजल तर ''तुम्ही पोलादनिर्मिती करून दाखविली तर आम्ही त्याचा प्रत्येक तुकडा खाऊन टाकू'' असे म्हणण्यापर्यंत गेली होती. भारतीय कंपन्या पोलादनिर्मिती करूच शकत नाही, असा ठाम विश्वास असल्याने अपकॉट महाशयांनी टाटांना ते आव्हान दिले होते. त्यांच्या त्या आव्हानानेच पुढे काय झाले, हे आपण सारेचजण जाणतो. टाटा उद्योग

**"गांधीजींसारख्या महान व्यक्ती सतत नाविन्याच्या, कल्पकतेच्या शोधात असतात आणि त्यामुळेच अगदी अशक्यप्राय वाटणारी मोठमोठी कामेही त्यांच्याकडून अगदी सहजी होऊन जातात. ही मंडळी कोणत्याही प्रश्नाकडे प्रगतीची संधी म्हणून पाहतात आणि साध्या साध्या विषयातील मोठा आशय शोधून सर्वांचे हित साधतात. त्यांची नजर नेहमी 'गेटिंग मोअर फ्रॉम लेस ॲन्ड फॉर मोअर' याकडे असते आणि गांधीप्रणित अभियांत्रिकी नेमकी त्यातूनच आकारास आली आहे."**

समुहाने पोलाद निर्मिती तर करून दाखविलीच परंतु २१ व्या शतकाच्या प्रारंभी इंग्लंडमधील सर्वात मोठ्या पोलाद उद्योगावर – 'कोरस स्टील' वर कब्जाही केला आहे.

आपले धिरूभाई अंबानीही याच जातकुळीतले ! 'फोन कॉल' चा खर्च पोस्ट कार्डाच्या किंमतीएवढाच असला पाहिजे. अशी कल्पना त्यांनी मांडली तेव्हा इतर सर्वांनीच ती हसण्यावारी नेली. परंतु आज धिरूभाईंच्या त्या महत्वाकांक्षी स्वप्नानेच साया जगभरच्या 'फोन इंडस्ट्री'चे रंगरूप पूर्णतया पाटलून टाकले आहे. सध्या भारतात सर्वाधिक वेगाने दूरध्वनीधारकांची संख्या वाढत असून 'कॉल रेटही सर्वात कमी आहेत.

यासंदर्भात, 'मिचिलीन टायर्स'च्या उदाहरणाचाही उल्लेख केला पाहिजे. या नव्या 'व्हॉल्वहविहीन टायर्सनी, 'पंक्चर' व दुरूस्तीची समस्याच आपल्या जीवनातून कायमची बाद केली आहे.

मध्यंतरी महंमद सैदउल्ला नावाच्या व्यक्तीने चक्क पाण्यावर सायकल चालवून दाखविली आणि या अचाट कामगरीबद्दल डॉ. अब्दुल कमाल यांच्याकडून शाबासकी मिळविली.

कमीतकमी श्रण, वेळ व पैशांत अधिकाधिक उत्पादन मिळविणे, हे अभियांत्रिकी क्षेत्रापुढील कायमचे आव्हान आहे. 'मोअर फ्रॉम लेस' हेच मूरच्या कायद्याचे आधारभूत तत्व आहे. एक काळ असा होता की जेव्हा साधा संगणक ठेवम्यासाठी एक संपूर्ण खोली लागे. आज त्या संगणकापेक्षा कित्येक पट



धीरूभाई अंबानी जमशेटजी टाटा

प्रभावी असा 'लॅपटॉप' प्रचारात आला आहे. सध्या त्याची किंमत हजार डॉलरच्या आसपास दिसते. आता तो फक्त शंभर डॉलरमध्ये आपण उपलब्ध करून देऊ शकतो का, याचा विचार झाला पाहिजे. इतक्या अल्प किंमतीत लॅपटॉप मिळाला'' तरच तो तळा–गाळातील जनतेपर्यंत पोचु शकेल. टाटा उद्योसमुहाची 'नॅनो' ही नवी मोटार नेमक्या याच विचारातून आकारास आली आहे. या मोटारीची किंमत दहा लाख रुपये असती तर ती खरीदणे मुठभर श्रीमंतांनाच शक्य झाले असते, पण ती फक्त एक लाख रुपये ठेवली गेल्यामुळे सर्वसामान्य नागरिकही ती सहज घेऊन शकणार आहे. 'गेटिंग मोअर फ्रॉम लेस ॲन्ड फॉर मोअर पिपल' या तत्त्वाचा मुर्तीमंत अविष्कार म्हणुनच या उदाहरणाकडे पाहावे लागेल. ही 'नॅनो' तयार झाली ती रतन टाटांच्या कल्पक शोधकतेतून ! स्कुटर व मोटारसायकलवर बसून जाणारे ३–४ माणसांचे कुटुंब आपण सारेचजण नेहमी पाहातो, परंतु ते पाहिल्यानंतर 'नॅनो' ची कल्पना सुचली ती मात्र फक्त रतन टाटांनाच !



कल्पक संशोधक तोच जो इतर कोणाच्याही लक्षात येत नाही अशी गोष्ट नेमकी हेरतो आणि त्या निरीक्षणातून काही तरी आगळेवेगळे आकारास आणतो. आज भारतीय युवकांपुढे आव्हान आहे ते केवळ कल्पक शोधकतेचे नाही तर अनुकंपेवर आधारित कल्पक शोधकतेचेच ! 'नॅनो' ही नेमकी अशा अनुकंपायुक्त शोधकतेचे प्रतिक आहे. मी 'मेरिको इन्नोव्हेशन फौंडेशन'चा अध्यक्ष आहे, हे तुम्ही सर्वजण जाणताच. या फौंडेशनतर्फे आम्ही कल्पक उत्पादने व सेवांना पुरस्कार देत असतो. गेल्या वर्षी आमचा तो पुरस्कार 'नॅनो' ने पटकावला होता आणि विशेष म्हणजे त्यावेळी ती गाडी बाजारात आलीही नव्हती ! 'नॅनो' ही परिवर्तनकारी शोधकतेचे उदाहरण आहे. तिचे स्वागत करायचे तर यापुढे तुम्हाला तुमच्या शोफरच्या गाडीसाठीही स्वतःच्या गाडीशेजारी जागा करून द्यावी लागणार आहे. एका अर्थाने त्याच्या 'नॅनोसाठी जागा म्हणजे तुमच्या मनाच्या कोपऱ्यात त्यालाही स्थान, असाच काहीसा हा प्रकार राहील.

नवे तंत्रज्ञान हे गोरगरीबांना परवडणारे, त्यांच्या गरजांची पूर्तता करणारे आणि त्यांना सहजी उपलब्ध होऊ शकणारे असेच असले पाहिजे. सध्या अमेरिकेत कृत्रिम पायांची किंमत १२ ते १८ हजार डॉलर एवढी आहे. पण जगात चार अब्ज लोक असे आहेत की ज्यांचे उत्पन्न दरदिनी २ डॉलर एवढेही नाही. त्यापैकी कोणाला एक कृत्रिम पाय खरीदायचा तर किमान १५ वर्षे काम करावे लागेल. येथे मी अमेरिकन पाय व भारतीय पाय यांच्यातील फरकाचा विचार करतो. भारतीय पाय हा अमेरिकी पायाइतका चांगला असून भागणार नाही तर तो टिकावूपणा व कार्यक्षमतेच्या बाबतीत दहा पट तरी अधिक चांगला असला पाहिजे. याचे कारण अगदी साधे आहे. भारतीय माणून जसा अनवाणी फिरतो तसा अमेरिकी माणून कधीही फिरत नाही. भारतीय माणूस भाताच्या वावरात दिवसभर वावरतो. तसे अमेरिकी माणूस कधीच करत नाही. त्यामुळे भारतीय पायांवर पडणारा ताण हा खुपच अधिक असतो. तो कमी करायचा तर बारा हजार डॉलर किंमतीचा कृत्रिम पाय आपल्याला तीस डॉलरमध्ये बनविता आला पाहिजे आणि तोही दहा पट उत्तम दर्जाचा ! आमच्याकडे तयार होणारे 'जयपुर फुटस' नेमके असेच आहेत. ते लावलेला माणुस साडेचार मिनीटांत एक किलोमीटर अंतर धावु शकतो. हा सर्व गांधीप्रणित अभियांत्रिकीचा परिणाम आहे.


महात्मा गांधी समवेत खान अब्दुल गफारखान.

भारतीय संशोधकांपुढे आव्हान आहे ते जमिनीवर पाय घट्ट रोवून दूरस्थ अवकाशातील तारे शोधण्याचे. मग तो अंतराळ मोहिम असो वा चांद्रयान, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असो वा अन्य काही. ही सर्व मोठमोठी कामे आपल्याला पाय जमिनीवर ठेवूनच करावी लागणार आहेत. डॉ. विजय भटकर यांनी सी-डॅकमध्ये परम महासंगणक तयार केले तेव्हा ही विशिष्ट भावनाच त्यांच्या कामी आली होती. आता आपण 'टेराफ्लॉपस' कडून 'पेटाफ्लॉपस'कडे जाण्याच्या प्रयत्नात

आहोत. पुण्यात टाटांसाठी सीआरएलने विकसित केलेला 'इका' हा जगातील सातवा सर्वात जलद संगणक आहे. तो तयार झाला केवळ ऐंशी कर्मचारी काम करीत असलेल्या एका छोट्या 'लॅब'मध्ये आणि त्याच्यासाठी खर्ची पडली फक्त शंभर दशलक्ष डॉलरची रक्कम. हे सारे अविश्वसनीय आणि अद्भुत असेच आहे.

आता आपण साक्षरतेचा मुद्दा घेऊ या. आज घडीस आपल्याकडे वीस कोटीहून अधिक नागरिक निरक्षर आहेत. निरक्षरतेचे प्रमाण दरवर्षी साधारणतः १.३ टक्क्यांनी घटते, त्या हिशेबाने आपले सर्व निरक्षर लोक साक्षर होण्यास सुमारे वीस वर्षांचा काळ लागेल. आपण हे काम पाच वर्षात आणि दरडोई दोन डॉलर खर्चात करू शकतो का ? टीसीएसचे एफ. सी. कोहली व त्यांचे सहकारी सध्या नेमके हेच करून दाखवित आहेत. त्यांनी संगणकाधारित साक्षरता कार्यक्रम तयार केला असून, त्याचा भर वर्णाक्षरांवर नव्हे तर शब्दांवर आहे. तुम्ही साडेपाचशे सहाशे शब्द ओळखू शकला तर संपूर्ण वृत्तपत्र वाचू शकता. त्यांच्या या कार्यक्रमाचा लाभ घेणाऱ्या महिला ६ ते ८ आठवड्यांत वाचायला शिकतात आणि त्यांच्या शिक्षणावर प्रत्येकी फक्त अडीच डॉलर खर्च होतात. गांधीप्रणित अभियांत्रिकीचा हा एक वेगळा अविष्कार आहे.

आता आपण 'शांता बायोटेक्स'च्या डॉ. वरप्रसाद रेड्डींचे उदाहरण घेऊ. हिपाटायटसच्या लशीचा डोस आठशे रुपयांना पडतो, परंतु डॉ. रेड्डींनी ती किंमत ३४ रुपयांवर आणली आहे. आज ५० टक्के जागतिक लसीकरण कार्यक्रमामध्ये हीच लस वापरली जाते. आता आपल्या औषध उद्योगातील संशोधकांनी हे उदाहरण डोळ्यांसमोर ठेवूनच कामास लागले पाहिजे. अर्थात अशी माणसे खूप मोठ्या संख्येने कशी उदयास येणार, हाच खरा प्रश्न आहे. परंतु गांधीप्रणित अभियांत्रिकीस गती द्यायची तर एक सैफुद्दीन व एक डॉ. रेड्डी पुरेसे नाहीत, हे मात्र निश्चित. त्याचे भान ठेवूनच आम्ही आता 'ग्लोबल रिसर्च अलायन्स' ची स्थापना केली आहे. सीएसआयआर (भारत)–सीएसआयआरओ (ऑस्ट्रेलिया)–सीएसआयआरए (द. आफ्रिका)–एफएचजी(जर्मनी)–टीएनओ (हॉलंड)–डीडीआय (डेन्मार्क) – एसआयआरआयएम (मलेशिया) व बॅटली (अमेरिका) अशा जगभरातील विविध वैज्ञानिक संस्था व तेथील साठ हजार वैज्ञानिक या उपक्रमात सहभागी आहेत. परस्पर सहकार्याने व सर्वांच्या हितासाठी काम करण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या या 'अलायन्स'चे ध्येय आहे. 'मोअर फ्रॉम लेस, फॉर मोअर अँन्ड मोअर' हेच ! जगापुढील नवनव्या गंभीर प्रश्नांची उकल करायची तर जगभरातील वैज्ञानिक व संशोधकांना या प्रकारे एकत्र येऊन काम करण्याखेरीज पर्यायच नाही. ही 'अलायन्स' आकारास आणत असतांना मी नेहमी 'राष्ट्रीय प्रयोगशाळा नव्हे तर राष्ट्र हीच प्रयोगशाळा' या आणखी एका संकल्पनेचाही पुरस्कार करीत असतो. त्याचे एक छान उदाहरण आहे ते 'मॅट्रिक्स लाइफ सायन्सेस' ने घेतलेल्या एका नव्या, कल्पक उत्पादनाच्या लायसेन्सचे. हे उत्पादन एक खेड्यातील छोट्या उद्योजकाने तयार केले असून उत्पादनाच्या पॅकिंगवर त्याचे छायाचित्र देण्यात येते. असा प्रकार जगात प्रथमच घडत असून, तो पाहिल्यानंतर अन्य छोट्या उद्योजकांना मोठी प्रेरणा



*डॉ. वरप्रसाद रेड्डी यांचा स्वस्तात काविळीवरचे औषध बनविल्याबद्दल पुरस्कार देऊन सत्कार करताना तत्कालीन राष्ट्रपती अब्दुल कलाम.*

मिळण्याची शक्यता आहे. हा प्रयोग म्हणजे जाहिरात क्षेत्रातील नवे संशोधनच आहे, असे म्हणायला अजिबात हरकत नाही. ''प्रत्येक माणसाच्या गरजा आपली धरतीमाता निश्चितपणे भागविते परंतु प्रत्येक माणसाची हाव मात्र ती पुरी करू शकत नाही,'' असे महात्माजी नेहमी म्हणत, त्याचा नेमका अर्थ आता आपण समजून घेतला पाहिजे. ''सर्वांच्या भल्यासाठी होणाऱ्या प्रत्येक संशोधनास मी पुरस्कार देईन'' असेही ते सांगत असत. 'गेटिंग मोअर फ्रॉम लेस ॲन्ड फॉर मोअर ॲन्ड मोअर'' हाच त्यांच्या या वक्तव्यांचा अर्थ असून, गांधीप्रणित अभियांत्रिकीचा तोच पाया आहे.



'समांतर रेषा एकमेकींना कधीच मिळत नाही' असे आपण लहानपणापासून शिकत आलो आहोत. परंतु (बहिर्गोल भिंग) 'कॉन्व्हेक्स लेन्स' मात्र नेमकी तीच किमया करून दाखवितात. गांधीजांसारख्या विभुती या बहिर्गोल भिंगासारख्या असतात. आपली सम्यक दृष्टी आणि हाती घेतलेल्या कामावरील संपूर्ण निष्ठेच्या बळावर त्या भिन्न-भिन्न विचारांच्या लोकांची एकजूट घडवितात आणि मग त्या ऐक्याच्या आधारे अनेक अविश्वसनीय वाटावी अशी कामे करून दाखवितात. आज आपल्या देशाला गरज आहे ती अशा बहिर्गोल भिंगी नेतृत्वाची, परंतु आपल्याला मिळत आहेत ते समाजात फुट पाडणारे अंतर्गोल भिंगी नेतेच. अर्थात हे चित्र बदलणे ही आपलीच जबाबदारी आहे. गांधीप्रणित अभयांत्रिकी ही फक्त जगातील गोरगरीबांसाठी उपयुक्त ठरणारी संकल्पना आहे. अशी प्रगत, पाश्चात्य देशांची समजुत असेल तर ती फार चुकीची आहे. सध्या खनिज तेलांसारखे नैसर्गिक साधनसंपत्तीचे स्रोत झपाट्याने घटत चालले आहेत आणि 'टिकावू प्रगती' हा प्रत्येकाच्याच चिंतेचा विषय बनला आहे. ही चिंता दूर करायची तर आपल्याला आपली स्पर्धात्मकता वाढवून आपले प्रत्येक उत्पादन मग ती मोटार असो वा डायपर - अधिकाधिक लोकांपर्यंत पोचवावे लागणार आहे. आपल्या प्रत्येक उत्पादनाच्या 'परफॉर्मन्स लेव्हल' मध्ये सातत्य असणे गरजेचे आहे. तुम्ही केवळ श्रीमंत ग्राहक डोळ्यांसमोर ठेवून महागडी उत्पादने कराल तर गरीब ग्राहक ती कधीच खरीदू शकणार नाहीत, परंतु तुम्ही गरीबांसाठी चांगले उत्पादन करात तर मात्र श्रीमंत लोकही ते वापरायला लागतील. गांधीप्रणित अभियांत्रिकीचा नेमका हाच संदेश आहे. तो समजून घेण्याऐवजी गांधीजींचा भर सुखोपभोगांच्या संपूर्ण त्यागावर आणि कंजुष दरिद्री राहणीमानावर होता, असे आपण म्हणत राहू तर ती आपली फार मोठी चूक ठरेल. समाजातील जास्तीत जास्त लोकांना आरामदायी आयुष्य जगण्याची संधी देणाऱ्या 'रामराज्यांची स्थापना करणे, हेच तर गांधीजींचे खरे स्वप्न होते. त्यांच्या द्रष्ट्या विचारसरणीचा आता पुन्हा एकदा नव्याने अभ्यास होण्याची गरज आहे. ही गरज मी आजवर अनेक आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर बोलून दाखविली आहे आणि त्याबद्दल अनेक थोरा-मोठ्यांची शाबासकीही मिळविली आहे. आता प्रश्न आहे तो फक्त गांधीजींची विचारधारा आपण जगापुढे नेमकी किती प्रभावीपणे नेतो आणि तिचे आकलन योग्य व्यक्तींना कसे करून देतो, हाच. आपण त्यात यशस्वी झालो तर गांधीप्रणित अभियांत्रिकी हाच नजिकच्या भविष्यात साऱ्या जगाच्या स्थायी प्रगतीचा व खऱ्याखुऱ्या सुख-स्वास्थ्याचा मुलाधार बनेल, याबद्दल माझ्या मनात तरी तीळमात्र शंका नाही.

■■■




# अर्थ -अन्वयार्थ व न्यायपालिका सुधार

- विजय नाईक, नवी दिल्ली

नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र, हरियाना व अरूणाचल प्रदेशात मिळालेल्या यशामुळे काँग्रेसच्या गोटात आनंदी आनंदाच वातावरण पसरलंय. अकबर मार्गावरील काँग्रेसच्या मुख्यालयात दुसरी दिवाळी साजरी झाली. भरपूर फटाकेबाजी, ढोलताशे व सोनिया गांधी, राहुल गांधी यांच्या 'जिंदाबाद'ची नारेबाजी झाली. भारतीय जनता पक्षाच्या अशोक मार्गावरील केंद्रीय कार्यालयात मात्र सारं कसं शांत शांत होतं. प्रत्येक निवडणुकीनंतर थोड्याफार फरकानं हेच चित्र दिल्लीत दिसतं. लोकसभेच्या निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवानी, पक्षाध्यक्ष राजनाथ सिंग व निवडणूक प्रचार व्यवस्थापक अरूण जेटली यांच्याविरूद्ध उठलेल्या वादळातून पक्ष अद्याप सावरलेला नाही. पराभवाची जबाबदारी कुणी घ्यावयाची यावरून उठलेल्या वादळानंतर खुद्द प्रवक्तेही वाहिन्यांवर मुलाखती देण्यास धजावत नव्हते, की अंतर्गत कलहाची मीमांसा करण्यास तयार नव्हते. नोव्हेंबर अखेर पक्षाच्या कार्यकारिणीची आयोजित करण्यात आलेली बैठकही पुढे ढकल्यात आली. त्या पराभवानंतर महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांनी शिकविलेला धडा भाजप व शिवसेना यांच्यासाठी मोठा 'राजकीय आघात' ठरणार, यात शंका नाही. काँग्रेसने केलेल्या 'हॅट्रिक' मुळे मात्र केंद्र व राज्यातील नेते मात्र बिनधास्त झाले आहेत. महाराष्ट्रातील काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसने मिळविलेले यश भरघोस असले, मॅजिक आकडा गाठेल, असा वृत्तपत्रे व वाहिन्यांचा अंदाज नव्हता. बव्हंश वाहिन्यांनी घेतलेल्या पाहाण्यातून, ''महाराष्ट्रात त्रिशंकु विधानसभा येईल, व मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हाती सत्तेची चावी लागेल,'' हे अंदाज चुकले. तरीही पारडे आघाडीच्या बाजूने झुकणार, असाच होरा सर्वत्र होता व तो खरा ठरला. त्रिशंकू विधानसभेचे चित्र निर्माण झाले असते, तर मोठ्या प्रमाणावर रस्सीखेच व घोडेबाजार झाला असता, तो आता होणार नाही, याचे श्रेय मतदाराला द्यावयास हवे.

२२ ऑक्टोबर रोजी मतमोजणीचे निकाल जाहीर होत असताना, काँग्रेसची सरशी होत आहे, हे पाहाता, माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख मुख्यमंत्रीपदाच्या संभाव्य चुरशीत शह ठोकून बसले. ''गेल्या चार वर्षात (आपल्या कारकीर्दीत झालेल्या

**“ उद्धव ठाकरे यांना कार्याध्यक्ष नेमल्यापासून पक्षांतर्गत आलेल्या नाराजीच्या लाटेमुळे संजय निरूपम, नारायण राणे, राज ठाकरे यांनी शिवसेनेच्या बुरूजाला सुरूंग लावले. छगन भुजबळ यांनी आधीच शिवसेनेला रामराम ठोकल्याने बाळासाहेबांची राजकीय पकड ढिली होऊ लागली. बाळासाहेबांच्या रिमोट कंट्रोलचा परिघ संकुचित झाला. उद्धवच्या शैलीवर नाराज असलेले परंतु बाळासाहेबांना मानणारे अनेक नाराज नेते शिवसेनेत आहेत. ते आणखी किती वर्ष राहातील, हे सांगता येत नाही. राज व उद्धव एकत्र येण्याची शक्यता नजिकच्या भविष्यकाळात तरी दिसत नाही. परंतु राज ठाकरे सारा महाराष्ट्र काबीज करणार काय, या प्रश्नाचे उत्तर सध्या तरी नकारार्थीच आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांची भूमिका कितपत परिणामकारी ठरेल काय, याचे उत्तर बऱ्याच गोष्टींवर अवलंबून असेल. 'मराठी माणूस' चा मुद्दा पुढे करीत राज ठाकरे यांनी तरूणांची मने जिंकली असली, तरी त्यांना नोकऱ्यात प्राधान्य देणे, मुंबईत मराठी माणसाला पुन्हा सुगीचे दिवस आणणे, त्यांच्या मनात सुरक्षेची भावना निर्माण करणे व त्यांची शक्ती विधायक कार्यात गुंतविणे, याबाबत ते येत्या काही महिन्यात दृश्य कामगिरी बजावू शकले, तरच जनमत त्यांच्याकडे वळेल. ”**

विकासामुळे काँग्रेसला मते मिळाली,'' असे ते ध्वनित करीत होते. मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना यशाचे श्रेय देण्यास ते तयार नव्हते. परंतु, आघाडीने १४४ चा आकडा गाठल्यावर मात्र त्यांचा नूर बदलला व आपण मुख्यमंत्री बनण्याचा प्रश्नच उदभवत नाही, असे त्यांनी सांगितले. एक गोष्ट देशमुख यांना कबूल करावी लागेल, की महाराष्ट्रातील यशात केंद्रीय व राज्यस्तरावरील सामुहिक नेतृत्वाचा वाटा असला, तरी त्या वाट्यातील काही प्रमाणातील श्रेय मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना द्यावे लागेल. ते मुख्यमंत्रीपदी असताना काँग्रेसने लोकसभा व विधासभेच्या निवडणुकीत यश मिळविले आहे. गेले केवळ नऊ महिने ते त्या पदावर आहेत. तेव्हा त्यांना कामगिरी दाखविण्याची अधिक संधि मिळाली पाहिजे. देशमुख यांनी मुख्यमंत्रीपदाचा उपभोगलेला काळ काही थोडाथोडका नाही, तर १९९९ ते २००३ व २००४ ते २००८, असा तब्बल आठ वर्षांचा आहे. भारतीय जनता पक्षात जसे आलटून पालटून अडवानी अथवा वाजपेयी यांच्याहाती पक्षाची सूत्रे असत, तसेच महाष्ट्रात आलटून पालटून सुशीलकुमार शिंदे व देशमुख यांच्या हाती मुख्यमंत्रीपद देण्यात आले होते. या पदासाठी पतंगराव कदम, नारायण राणे गेली अनेक वर्षे प्रयत्न करीत आहेत. तथापि, केंद्राने ही माळ त्यांच्या गळ्यात घातलेली नाही. राणे यांनी अलीकडे देशमुख यांच्याबरोबर हातमिळवणी करून त्यांचे चिरंजीव अमित देशमुख यांचा प्रचार केला, तो मुख्यमंत्रीपदावर लक्ष्य ठेऊन. त्याचा उपयोग झाला नाही. या निवडणुकीच्या निमित्ताने प्रांताध्यक्ष माणिकराव ठाकरे यांचा नवीन चेहराही समोर आला. त्यांना शासनाचा अनुभव नाही व त्यांचे नेतृत्व सर्वसमावेशक नाही, त्यामुळे नजिकच्या भविष्यकाळात त्यांना संधि मिळण्याची शक्यता कमी. तसे पाहिले पाहिले, तर महाराष्ट्राच्या काँग्रेसपक्षात, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासारखा सध्या एकही 'मास लीडर' नाही. प्रत्येकाचे प्रभावक्षेत्र हे फक्त त्याच्या मतदारसंघ अथवा विभागापुरते मर्यादित आहे. मराठवाड्यात काही प्रभावक्षेत्र विलास देशमुख व मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्यात विभागलेले, तर राणे यांच्या प्रभावाला कोकणची मर्यादा आहे. पंतगराव यांचे तर दिल्लीतील प्रभावक्षेत्रही सीमित होत चाललेले.






''कोणत्याही राज्यातील काँग्रेस नेत्याला मोठे होऊ द्यायचे नाही,'' हे धोरण इंदिरा गांधी यांच्या काळापासून राबविले जात आहे, हे नेत्यांच्या सीमित प्रभावाचे प्रमुख कारण आहे. उलट परिस्थितीत भारतीय जनता पक्षात वेगळे चित्र दिसते. गुजरातचे नरेंद्र मोदी, छत्तीसगढचे रमण सिंह व मध्य प्रदेशचे शिवराजसिंह चौहान हे मुख्यमंत्री स्वयंभू झाले आहेत. त्यांनी आपले शासन विकासात्मक ठेऊन प्रतिमा निर्माण केल्याने त्यांच्या नेतृत्वाला हात लावण्यास केंद्रीय नेतृत्व सरसावलेले नाही. राजस्तानमधील पराभवाला माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांना जबाबदार धरण्यात आले. त्यांनी राजीनामा द्यावा, यासाठी गेले काही महिने दबाव आला. परंतु प्रत्यक्षात तो घेण्यासाठी २३ नोव्हेंबरपर्यंत अडवानी व राजनाथ सिंग यांना प्रतिक्षा करावी लागली. अडवानी यांना सादर केलेल्या राजीनाम्याच्या पत्रातही श्रीमती राजे यांनी केंद्रीय नेतृत्वालाच फैलावर घेतले. राजनाथ सिंग यांची त्यामुळे पंचाईत झाली. आणखी एक कारण म्हणजे, भाजपच्या बव्हंशी आमदारांचा राजे यांना असलेला पाठिंबा. येत्या महिन्यात राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षपदाची मुदत संपत असल्याने ते राजे यांच्या पथ्थ्यावर पडणार.

महाराष्ट्राच्या निकालांकडे पाहिल्यास लोकसभेच्या निवडणुकांप्रमाणेच, मनसेचा घटक शिवसेना व भाजपच्या मुळावर आला, हे स्पष्ट होते. लोकसभेच्या निवडणुकीतही राज ठाकरे यांनी या दोन्ही पक्षांना पाणी पाजले. त्यामुळे चिडलेले सेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी राजला 'जीना' म्हटले, कुणी 'बेडूक,' कुणी 'सुपारीवाला' व कुणी 'काँग्रेसचा दलाल' म्हटले, परंतु त्याचा मतदारांवर काही परिणाम झाला नाही. उलट त्यांनी मनसेला तब्बल १३ जागा देऊन शिवसेनेचे १२ वाजविले व सेनेला चौथ्या क्रमांकावर ढकलले. राजकीय निरिक्षकांच्या मते, ''राज ठाकरे यांच्या प्रभावाचा फटका भाजप व शिवसेनेला किमान २७ जागांवर बसला.'' उद्धव ठाकरे, गोपीनाथ मुंडे यांची मुख्यमंत्रीपदाची स्वप्ने धुळीस मिळाली. शिवसेनेच्या प्रारंभापासून शिवसेनेला साथ देणारा मराठी माणूस, युवा व महिला, मुंबई, पुणे, ठाणे आदी शहरातून राज ठाकरे यांच्याबरोबर

आहेत, हे सिद्ध झाले. उद्धव ठाकरे यांच्यापुढे राजने आता राजकीय भविष्याचे आव्हान निर्माण केले आहे. सेनेच्या गेल्या काही वर्षांच्या राजकारणाकडे पाहिल्यास असे दिसते, की सेनेने मराठी माणसापलिकडे आपला मतदारसंघ वाढवायला सुरूवात केली होती. तसे करून काँग्रेस व राष्ट्रवादीच्या बुरूजांना आपण खिंडारे पाडू, असे ठाकरे व अन्य नेत्यांना वाटले. किंबहुना त्यामुळेच त्यांनी मराठी माणसाला बाजूला ठेवून राम जेठमलानी, वेणुगोपाल धूत, चंद्रिका केनिया, प्रितिश नंदी, संजय निरुपम आदी गैरमराठी व्यक्तींना राज्यसभेवर पाठविले. ही क्लुप्ती करून मराठेतर मताला ते आकर्षित करू पाहात होते. परंतु, प्रत्यक्षात ज्या पायावर (मराठी माणूस) त्यांची इमारत होती, तोच पाया उखडला जात होता. त्यात भर पडली, ती बाळासाहेबांच्या पुत्रप्रेमाची. उद्धव ठाकरे यांना कार्याध्यक्ष नेमल्यापासून पक्षांतर्गत आलेल्या नाराजीच्या लाटेमुळे संजय निरूपम, नारायण राणे, राज ठाकरे यांनी शिवसेनेच्या बुरूजाला सुरूंग लावले. छगन भुजबळ यांनी आधीच शिवसेनेला रामराम ठोकल्याने बाळासाहेबांची राजकीय पकड ढिली होऊ लागली. बाळासाहेबांच्या रिमोट कंट्रोलचा परिघ संकुचित झाला. उद्धवच्या शैलीवर नाराज असलेले परंतु बाळासाहेबांना मानणारे अनेक नाराज नेते शिवसेनेत आहेत. ते आणखी किती वर्ष राहातील, हे सांगता येत नाही. राज व उद्धव एकत्र येण्याची शक्यता नजिकच्या भविष्यकाळात तरी दिसत नाही. परंतु राज ठाकरे सारा महाराष्ट्र काबीज करणार काय, या प्रश्नाचे उत्तर सध्या तरी नकारार्थीच आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांची भूमिका कितपत परिणामकारी ठरेल काय, याचे उत्तर बऱ्याच गोष्टींवर अवलंबून असेल. 'मराठी माणूस' चा मुद्दा पुढे करीत राज ठाकरे यांनी तरूणांची मने जिंकली असली, तरी त्यांना नोकऱ्यात प्राधान्य देणे, मुंबईत मराठी माणसाला पुन्हा सुगीचे दिवस आणणे, त्यांच्या मनात सुरक्षेची भावना निर्माण करणे व त्यांची शक्ती विधायक कार्यात गुंतविणे, याबाबत ते येत्या काही महिन्यात दृश्य कामगिरी बजावू शकले, तरच जनमत त्यांच्याकडे वळेल. बाळासाहेबांनी प्रथम दाक्षिणात्य, नंतर मुस्लिम व नंतर भैय्ये-बिहारी यांच्यात एक प्रकारचा वचक व भीती निर्माण केली. त्यामुळे मराठी माणसाला त्यांचा आधार





वाटू लागला. शिवसेना फ ोफ ावली. त्याच पावलावर राज जाणार काय? त्यांचा संकुचित दृष्टिकोन अन्य पक्षांना मानवणारा नाही. ''मनसेचा पाठिंबा घेणार नाही,'' असे काँग्रेसचे नेते ठामपणे सांगू लागले. ते त्यामुळे.

आघाडीला बहुमत मिळाले नसते, तर राजचा पाठिंबा कुणाला असा प्रश्न उद्‌भवला असता. आता निवडून आलेले बंडखोर व अपक्ष यांचा ताफ ाही आघाडीला आपल्याकडे वळविता येणार असल्याने मनसेची गरज सरकारला भासणार नाही. अशा परिस्थितीत मनसे सरकारला मुद्यांवर आधारीत पाठिंबा देणार काय, हे पाहावयाचे.

या निवडणुकीत काँग्रेसला लाभ झाला, तो केंद्रातील स्थिर सरकारच्या प्रतिमेचा. भीषण दुष्काळाचे सावट असताना व काही ठिकाणी अतिवर्षा होऊनही मतदाराने आघाडीला साथ दिली. सोनिया गांधी, डॉ मनमोहन सिंग व राहुल गांधी यांच्या दौऱ्याचा जसा मोठा लाभ झाला, त्याचप्रमाणे राष्ट्रवादीबरोबर एकत्रितपणे निवडणुकीत उतरल्याने जनतेपुढे ऐक्याचे चित्र उभे राहिले. एकमेकावर धोबीपछाड करीत आतून निवडणूक 'सॅबोटेज' करण्याचे प्रकारही घडले. तथापि, बंडखोर म्हणून बाहेर पडलेले नेते हे मूळचे काँग्रेस अथवा राष्ट्रवादीचे असल्याने त्यांना हाताळणे आघाडीला सोपे जाणार आहे. २१ पक्षांचे रिडालोस पुढे १७ पक्षांचे रिडालोस उरले. याच पक्षांनी स्वतंत्रपणे २००४ मध्ये साडे चारशेपेक्षा अधिक जागा लढविल्या होत्या, परंतु त्यापैकी त्यांना केवळ तीन जागा मिळाल्या होत्या. यंदा एकत्र लढल्याने रिडालोसला १४ जागा मिळाल्याने ते आघाडीत सामील होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसे झाल्यास त्यांच्या हाती काही मंत्रिपदे लागतील.

मायावती यांच्या बहुजन समाज पक्षाने २८१ जागा लढवून एकही जागा हाती आली नाही, यावरून त्यांचे नेतृत्व मानायला अजूनही मराठी मतदार तयार नाही, असे दिसते. २००९ मध्ये झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीतही बहुजन समाज पक्ष महाराष्ट्रात आपला ठसा उमटवू शकला नाही. मायावती यांची प्रतिमा दलितांची 'तारणहार' यापासून ते स्वतःच्या उदात्तीकरणावर, दैवीकरणावर उधळपट्टी करणाऱ्या बेजबाबदार नेत्या अशी बनली आहे. याचा पुरावा पाहायचा असल्यास कुणीही दिल्लीतील नोयडा परिसरात उभारलेल्या शेकडो एकरांच्या आंबेडकर पार्कला भेट देऊ शकते. हत्ती हे त्यांच्या पक्षाचे निवडणूक चिन्ह. लखनौ असो, की दिल्ली मायावती यांनी एक, दोन फुटी हत्तींपासून ते महाकाय हत्तींच्या मुर्त्या सर्वत्र उभारलेल्या दिसतात. त्यामुळे त्यांच्या निवडणूक चिन्हाचा आपोआप प्रचार होतो. स्वतःच्या हयातीत स्वतःचे पुतळे उभारणारा हिटलर होऊन गेला. मायावती या हिटलर नाही, परंतु पार्क व पुतळ्यांवर खर्च होणाऱ्या कोट्यावधी रूपयांचा विनियोग त्या निश्चितच गोरगरिबांसाठी, दलितांसाठी करू शकल्या असत्या. तरीही त्यांचा एक सवाल रास्त वाटतो. तो



म्हणजे, स्वतःच्या कुटुंबियांचे पुतळे उभारण्याचा, प्रत्येक विमानतळ, चौक आदींना राजीव गांधी, इंदिरा गांधी, नेहरू यांची नावे देण्याचा अधिकार केवळ गांधी कुटुंबाला अथवा काँग्रेसलाच आहे काय? महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीत गेली वीस वर्षे सातत्यानं फूट पडत गेली. त्यामुळे आंबेडकरांचे दलितांच्या उद्धाराचे स्वप्न बासनात राहिले. ही नेतेमंडळी केवळ स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्यात गर्क असतात. मंत्रिपद मिळेपर्यंत बाबासाहेबांचा उच्चार व उद्धार व नंतर त्यांचा विसर, हे ठरलेले. महाराष्ट्रातील दलितांना काँग्रेस व राष्ट्रवादीचा दिलासा वाटतो, तो त्यामुळेच.

गेल्या वेळेपेक्षा (६९) काँग्रेसला यंदा ८२ तर राष्ट्रवादीला गेल्या वेळेपेक्षा (७१) यंदा ६२ जागा मिळाल्याने निर्विवाद बहुमताकडे आघाडीची वाटचाल होईल. २६ अपक्ष व बंडखोरही सरकारकडे वळतील. पण सर्वाधिक फटका बसला तो राजू शेट्टी व सदाशिव मंडलीक व पवार यांच्या विरोधात भूमिका घेणारे साताऱ्याचे राष्ट्रवादीचे खासदार उदयनराजे भोसले यांच्या प्रभावक्षेत्राला. त्यांचे नेतृत्व जवळजवळ संपुष्टात आले व मतदार पुन्हा राष्ट्रवादीकडे वळले. महाराष्ट्रात शिवसेना व भाजपला कायमचे आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे. शिवसेना चौथ्या क्रमांकावर (गेल्या निवडणुकातील ६२ जागांवरून ४४ जागा) ढकलली गेल्याने बाळासाहेब ठाकरे इतके संतापले, की मराठी माणसाने खंजिर खुपसल्याची तीव्र प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. शिवसेनेच्या पीछेहाटीने कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांच्या राजकीय भवितव्याबद्दलच प्रश्नचिन्ह निर्माण झालय. भाजपच्या उतरणीचा प्रवासही ५४ जागांकडून ४६ जागा असा झाला.

देशातील विस्तृत राजकीय चित्राकडे पाहिल्यास असे दिसते, की अलीकडे काँग्रेसला महाराष्ट्र व दिल्ली या दोन राज्यात तिसऱ्या वेळेस यश मिळाले. दिल्लीत मुख्यमंत्री शीला दीक्षित यांनी हॅटट्रिक केली. त्यांच्याविरूद्ध 'अँटी इन्कंबंसी' घटक नव्हता. काही वर्षांपूर्वी मध्य प्रदेशात मुख्यमंत्री दिग्विजय सिंग यांचे सरकार तब्बल दहा वर्ष चालले, परंतु 'बिजली, सडक, पानी' या तीन गोष्टींकडे लक्ष न दिल्याने मतदाराने त्यांना दरवाजा दाखविला. महाराष्ट्रातही आघाडी सरकार दहा वर्ष आहे. या सरकारबाबत 'अँन्टि इन्कंबंसी' घटकही होता. परंतु मतपेटीत त्याचे प्रतिबिंब मोठ्या प्रमाणावर पडले नाही, कारण विखुरलेले विरोधक व युतीचा ढासळलेला प्रभाव व प्रतिमाऱ्हास. गोपिनाथ मुंडे व नितीन गडकरी यांच्यात गेले काही महिने चाललेली राजकीय रस्सीखेच यामुळेही मतदार युतीकडे वळला नाही. परंतु यशाने आघाडीच्या नेत्यांनी हुरळून जाता कामा नये, की "आश्वासने पूर्ण केली नाही, तरी मतदार कायमचे आपल्याबरोबर राहातील," अशी बिनधास्त वृत्तीही बाळगू नये. महाराष्ट्राचे स्थान आज गुजरात, कर्नाटक व तामिळनाडू या राज्यांपेक्षाही अधिक घटले असून, येत्या पाच वर्षात ते भरून काढण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे लागतील. शहरी व ग्रामीण भागात तासन्तास असलेल्या भारनियमनाचा दुष्परिणाम औद्योगिक उत्पादन, कृषीव्यवस्था, शिक्षण, पायाभूत रचना या सर्वांवर होत असल्याने विद्युतनिर्मितीला पहिला क्रमांक द्यावा लागेल. तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर रामबाण उपाय शोधावा लागेल.

महाराष्ट्राव्यतिरिक्त हरियाना व अरूणाचल प्रदेशात झालेल्या विधानसभाच्या निवडणुकांपैकी अरूणाचल मधील काँग्रेसचे दोन तृतीयांश बहुमत अपेक्षित होते. निवडणुकीच्या ऐन पूर्वसंध्येवर चीनने अरूणाचलवर दावा केल्याने स्थिर सरकार देणाऱ्या काँग्रेसकडे मतदार सुरक्षिततेच्या दृष्टीने वळला. मुख्यमंत्री दोरजी खंडू यांचे स्थान विधानसभेच्या एकूण ६० जागांपैकी ४२ जागा मिळून आणखी भक्कम झाले. चीनला लोकशाही प्रक्रियेने एक चपराक दिली. पंतप्रधान अरूणाचलमध्ये प्रचार दौऱ्यावर गेले, तेव्हाही चीनने कोल्हेकुई केली. तिला सरकारने भीक घातली नाही, की तवांगला पुढील महिन्यात भेट देणाऱ्या



*दलाई लामा यांची अरुणाचलला भेट*



दलाई लामा यांच्या दौऱ्यावर बंधने घातली नाही. तथापि, राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे, ते या राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस व तृणमूल काँग्रेसला मिळालेल्या प्रत्येकी पाच जागांबाबत. राष्ट्रवादीच्या गेल्या वेळेपेक्षा तीन जागा वाढल्या व तृणमूलने प्रथमच आघाडी मारली. उलट, भाजपच्या जागा ९ वरून ३ वर आल्या. चीनबाबत मवाळ भूमिका घेतली जात आहे, अशी टीका व प्रचार भाजपने करूनही मतपेटीत लाभ झाला नाही.

हरियानात मात्र काँग्रेसला दणका बसलाय तो ओमप्रकाश चौताला यांच्या इंडियन नॅशनल लोकदल या पक्षाचा. भाजपने काही महिन्यांपूर्वीच आयएनएलडी बरोबर काडीमोड केला होता. अन्यथा आयएनएलडी, भाजप व हरियाना जनहित पक्ष एकत्र आले असते, तर काँग्रेसच्या हातून हे राज्य गेले असते. निवडणुकीपूर्वी काँग्रेसला पंचावन्न ते साठ जागा मिळतील, हा अंदाज सपशेल फसला. हरियाना हे बन्सीलाल, देवीलाल व भजनलाल या तीन 'लाल' चे राज्य मानले जाते. त्यातील भजनलाल हे 'आयाराम गयाराम' राजकारणाचे कप्तान. त्यांची सद्दी संपविली, ती भूपेन्द्रसिंग हुडा यांनी. गेल्या तीस वर्षात हरियानात कोणत्याही पक्षाला सतत पाच वर्षांपेक्षा अधिक सत्ता मिळाली नव्हती. तो पायंडा मोडण्यात हुडा यांना यश मिळाले, पण बहुमत निसटले. २००४ मध्ये झालेल्या निवडणुकीत काँग्रेसला ९० जागांपैकी ६७ जागा मिळाल्या होत्या. घसरण होऊन यावेळी केवळ ४० जागांवर समाधान मानावे लागले. सरकार बनविण्यासाठी पुन्हा भजनलाल यांच्या जनहित पक्षाकडे पदर पसरण्याची वेळ आली. त्यांचे चिरंजीव कुलदीप बिश्नोई यांच्या पाठिंब्यावर हुडांचे सरकार चालणार आहे. २२ ऑक्टोबर रोजी निकाल जाहीर होत असताना प्रारंभी प्रफुल्लीत असणारा हुडा यांचा चेहरा सायंकाळपर्यंत बराच चिंताग्रस्त झाला होता. चौताला यांच्या पक्षाने तब्बल ३२ जागा मिळवून काँग्रेसला पेचात टाकले. हुडा यांचे नेतृत्व बदलण्याचे जोरदार डावपेच सुरू झाले. कुमारी शैलजा, आर.एस.सूरजेवाला यांच्या नावाची चर्चा सुरू झाली. अखेर महाराष्ट्र, हरियाना व अरूणाचल प्रदेशात नेतृत्व कायम ठेवण्याचा निर्णय पक्षाध्यक्षा सोनिया गांधी यांनी घेतला व लॉबिंग थंडावले. हरियानातील गुडगावचे गेल्या दहा वर्षात सिंगापूर सारखे शहर झाले. बरीच सुबत्ता आली. संगणक, वाहन व बांधकाम क्षेत्रातील बव्हंशी कंपन्यांची टोलेजंग व अत्याधुनिक कार्यालये तेथे आहेत. 'मॅनहॅटन,' 'बिव्हरली हिल्स,' 'कार्लटन हाईट्स' आदी पाश्चात्य नावे असलेली अत्याधुनिक कॉन्डोनमिनियम्स आहेत, मॉल्सने गुडगाव भरले आहे. परंतु, तेथील होंडा कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी संप करून कंपनीचे व्यवस्थापन व सरकारलाही बेजार केले होते. हरियानाची भूमी सुपिक. शेतकरी सधन. प्रभाव जाट, गुज्जर यांचा. राजकारण 'लठ' म्हणजे लाठीचे. यावेळी हुडा यांनी स्वतःच्या मर्जीतील सुमारे ७० उमेदवारांना तिकिटे दिली.

त्यामुळे शेलजा व राव इंदरसिंह यांचा गट नाराज होता. अंतर्गत बंडाळी झाल्याने काँग्रेसला फ टका बसला. तरीही तिन्ही राज्यात काँग्रेसने पुन्हा सरकार स्थापन केल्याने काँग्रेसच्या गोटात समाधान व्यक्त केले जाते. हुडा यांना चौताला गप्प बसू देणार नाही. विधानसभेत अनेक मुद्दयांवरून सरकारला कात्रीत पकडले जाईल. त्यासाठी त्यांना तयार राहावे लागेल.

या यशापयशाव्यतिरिक्त राजधानी व देशभर चर्चा आहे, ती न्यायपालिकेतील संभाव्य सुधारणांची, कायदे मंत्री वीरप्पा मोईली यांच्या क्रांतिकारी प्रस्तावांची. गेल्या काही महिन्यात निर्माण झालेल्या जनता, वृत्तपत्रे व सरकार यांच्या दबाबामुळे न्यायमूर्तींनी उत्पन्न जाहीर करण्याचे ठरविले. या आधी त्यांच्या उत्पन्नाचा तपशील सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती केवळ मुख्य न्यायाधीशाकडे सुपूर्द करायचे. तो गोपनीय स्वरूपाचा असल्याने कधीच जाहीर केला जात नसे. उलट निवड णुकीतील आचारसंहितेनुसार उमेदवाराला उत्पन्न, स्थावर जंगम मालमत्ता जाहीर करण्याचे बंधन घालण्यात आले आहे. न्यायमूर्तींना वाटते की, संबंधित तपशील जाहीर केल्यास सार्वजनिक हिताच्या नावाखाली (पब्लिक इन्टरेस्ट लिटिगेशन) कुणीही संपत्तीचा तपशील मागून हवे ते प्रश्न उपस्थित करील. त्यामुळे न्यायमूर्तींची, न्यायालयाची प्रतिष्ठा धोक्यात येईल. परंतु कोणतीही व्यक्ती न्यायमूर्तींबाबत अशा प्रकारची माहिती मागण्यापूर्वी दहा वेळा विचार करील, की आपण जे करीत आहोत, ते योग्य आहे, की अयोग्य. मोईली यांना न्यायप्रक्रियेत गती हवी आहे. ते म्हणतात, की न्यायदानाची प्रक्रिया इतकी शिथील झाली आहे, की खटला दाखल केल्यापासून निकाल लागावयास किमान पंधरा वर्षे लागतात. तारखांवर तारखा पडत असतात. पक्षकार जेरीस येतात. ज्याच्याकडे पैसा आहे, तो आपली केस वर्षानुवर्षे चालवू शकतो. सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊ शकतो. गरीबाला न्याय मिळत नाही, हे तर रोजचे झाले आहे. अनेक ठिकाणी न्यायप्रक्रियेतील संगनमत आडवे येते. शिवाय सरकार देशातील सर्वात मोठा दावेदार (लिटिगंट) असल्याने न्यायदानास अधिक विलंब लागतो.

या संदर्भात २४ व २५ ऑक्टोबर रोजी दिल्लीत झालेल्या परिषदेत मोईली यांनी जाहीर केले की, दाव्यांच्या संदर्भातील राष्ट्रीय धोरण लौकरच जाहीर केले जाईल. सध्या उच्च व कनिष्ट न्यायालयात ३० जून २००९ अखेर तब्बल ३ कोटी खटले पडून आहेत. ही संख्या कमी करण्यासाठी ॲटर्नी जनरल जी.ई.वहानवटी व सॉलिसिटर जनरल गोपाल सुब्रमण्यम यांच्या नेतृत्वाखाली ५२ वकील व २५ कायदे संशोधकांचा गट नेमण्यात येणार आहे. पन्नास हजार खटले सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. मोईली यांच्यामते, खटल्याचा कालावधी १५ वर्षांवरून तीन वर्षांवर आणण्याचे उद्दिष्ट असून, ते येत्या पाच वर्षात साध्य करण्याचे प्रयत्न होतील. न्यायपालिकेचे उत्तरदायित्व महत्वाचे आहे. सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश के.जी. बालकृष्णन यांच्यामते, ''न्यायदानातील विलंबाला राज्याकडून मिळणारे तुटपुंजे अर्थसाह्य हे कारण असून, त्यामुळे न्यायालयातील आवश्यक कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करणेही अशक्य झाले आहे.'' मोईली म्हणाले, की ग्रामीण भागातील जनतेला कोर्टकचेऱ्याच्या खेट्या घालण्याचा त्रास होऊ नये, यासाठी पाच हजार ग्राम न्यायालये सुरू करण्यात येतील. उच्च न्यायालये व राज्य सरकारांनी या प्रस्तावास पाठिंबा दर्शविला आहे. अपंग, महिला व ज्येष्ठ नागरिकांना जलद न्याय मिळावा, यासाठी तीन शिफ्ट्समध्ये चालणारी फि रती न्यायालये सुरू करण्यात येतील. न्यायदानात होणाऱ्या विलंबाचे आणखी एक कारण म्हणजे, न्यायमूर्तींच्या नेमणुकीस सरकारतर्फे होणारा विलंब. मोईली यांनी या प्रक्रियेलाही गती देण्याचे ठरविले आहे. तसेच, ''ठपका (टेन्टेड) असलेल्या न्यायमूर्तीला नेमण्यात येणार नाही,'' असेही जाहीर केले. ते म्हणाले, की न्यायपालिकेवरील गुंतवणूक ही देशाच्या एकूण उत्पादनप्रक्रियेवरील गुंतवणूक होय. भारतातील न्यायपालिका स्वतंत्र आहे. त्यामुळे परदेशी गुंतवणूकदारांनाही न्याय मिळेल याची खात्री वाटते, तसेच न्यायदानास विनाविलंब झाल्यास, दावेदार व प्रतिपक्षाचा होणारा कोट्यावधी रूपयांचा खर्च कमी होईल व जनतेत एक प्रकारचे मानसिक समाधान निर्माण होईल. आज कोणताही किचकट प्रश्न असला, की सरकार त्यावर निर्णय न घेता, न्यायालयाकडे धाव घेते व स्वतःचा हात झटकून टाकते. त्यात राजकीय स्वरूपाच्या काही किचकट समस्या असतात. न्यायालयाचा शब्द प्रमाण असतो. परंतु, न्यायालय हे संसदेपेक्षा श्रेष्ठ नाही, असाही सूर गेल्या काही वर्षात संसदेतील चर्चेतून समोर येत आहे. काही राज्यातील सभापतींनी न्यायालयापुढे जाण्याचे नाकारले होते. त्यामुळे संसद व न्यायपालिकेचे संतुलन ढळणार काय, असा प्रश्न निर्माण झाला होता व काही प्रमाणात तो आजही आहे. न्यायपालिकेतील सुधारणा हा न्यायपालिकेवरील सरकारचा अंकुश तर ठरणार नाही ना, अशीही शंका उपस्थित केली जाते. त्यामुळेच लोकशाहीच्या सर्व स्तंभांना एकमेकांची प्रतिष्ठा राखीत वाटचाल करावी लागेल, अधिकारकक्षांच्या सीमेत वावरावे लागेल व न्यायपलिकेतील भ्रष्टाचाराला संपुष्टात आणावे लागेल.

■■■



# वेध नोबेलच्या मानकऱ्यांचा

– एल. श्रीधर

निसर्गाला अधिकाधिक समजून घेत असतानाच मानवी जीवन आणखी सुखदायी आणि निरोगी करण्याचा प्रयत्न शास्त्रज्ञ करीत असतात. त्यांच्या या प्रयत्नातूनच वैद्यकशास्त्र मोठ्या प्रमाणावर विकसित झाले. त्यामुळेच अनेक रोगांवर लशी उपलब्ध झाल्या, शरीरातील काही निकामी अवयवे काढून नव्या अवयवांचे रोपण करणे शक्य झाले आणि मानवाचे सरासरी आयुर्मान वाढले. असे असले, तरी अनेक व्याधींवर अजूनही परिणामकारक लशी नाहीत. एचआयव्ही- एड्स, स्वाइन फ्लू आदींसारखे विषाणूजन्य रोग थैमान घालत आहेतच. या साऱ्यांवर मात करण्यासाठीचे संशोधन शास्त्रज्ञ करीत आहेत. त्याचबरोबर वाढत्या वयाबरोबर येणारे वार्धक्य कसे लांबवता येईल आणि मानवाला 'अजूनही यौवनात मी' वाटण्यासारखी स्थिती कशी निर्माण करता येईल, यासाठीचे प्रयोग शास्त्रज्ञ करीत आहेत. आरोग्याबरोबरच मानवाला उत्तमोत्तम भौतिक सुविधा कशा मिळतील, यासाठीचे संशोधनही चालू आहे. अशा संशोधनात महत्त्वाचा टप्पा गाठलेल्या नऊ शास्त्रज्ञांना (एलिझाबेथ ब्लॅकबर्न, कॅरोल ग्राइडर, जॅक त्झोस्टॅक, चार्ल्स केन काओ, विलार्ड बॉइल, जॉर्ज एल्वूड स्मिथ, वेंकटरमण रामकृष्णन, थॉमस स्टिट्झ आणि अदा योनाथ )यंदाचे नोबेल पारितोषिक जाहीर झाले आहे. या 'नवरत्नां'मध्ये भारतीय वंशाचे शास्त्रज्ञ डॉ. वेंकटरमण रामकृष्णन यांचा समावेश आहे. त्यामुळे या वर्षीच्या नोबेल पारितोषिकाने भारतीयांना एक सुखद धक्का दिला आहे.

वैद्यकशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र या तीन शास्त्रांबरोबरच शांतता आणि साहित्य या विषयांसाठीही नोबेल पारितोषिक जाहीर केले जाते. त्याचबरोबर अर्थशास्त्रासाठीही नोबेल सन्मान जाहीर होतो. भौतिक जगतात मानवाने कितीही प्रगती केली, तरी तो त्याच्यातील षड्रिपुंवर मात करू शकत नाही. त्यामुळेच ज्या विज्ञानाच्या साह्याने तो प्रगतीची शिखरे गाठत असतो, त्याच विज्ञानाच्या आधारे तो आपल्याच भाईबंदांच्या जीवावर उठतो- कधी धर्माच्या नावाने, कधी राष्ट्राच्या नावाने, कधी अस्मितेच्या नावाने, तर कधी हितसंबंधांच्या रक्षणासाठी स्वार्थी भावनेने. यामुळेच जगात रक्तरंजित संघर्ष चालू आहे. तो कमी करीत जगात समरसतेचे, सौहार्दतेचे आणि शांततापूर्ण सहजीवनाचे वातावरण निर्माण करणाऱ्यांना शांततेचे पारितोषिक दिले जाते. यंदा ते अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांना जाहीर झाले आहे. आपल्या वक्तृत्वाने, कल्पकतेने, थेट संवाद साधत हृदयात हात घालण्याच्या सहजतेने ओबामा यांनी अमेरिकी नागरिकांची मने जिंकली आहेत. त्याच बळावर इतिहास घडवत ते अमेरिकेचे अध्यक्ष बनले. महासत्तेचा अध्यक्ष या नात्याने जागतिक राजकारणावरही वेगळा ठसा उमटविण्यास त्यांनी सुरवात

**"जगातील नऊ नामवंत व्यक्ती व शास्त्रज्ञांना या वर्षीचा (२००९) नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. या नवरत्नांमध्ये भारतीय वंशाचे शास्त्रज्ञ डॉ. वेंकटरमण रामकृष्णन यांचा समावेश आहे. त्यामुळे यावर्षीच्या नोबेल पारितोषिकाने भारतीयांना एक सुखद धक्का दिला आहे. रामकृष्णन हे मूळचे भारतीय. तमिळनाडूतील चिदंबरम येथे १९५२ मध्ये त्यांचा जन्म झाला. बडोदा विद्यापीठातून त्यांनी भौतिकशास्त्राची पदवी घेतली आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ते १९७१ अमेरिकेला गेले आणि शिक्षणानंतर तेथेच त्यांनी अध्यापन आणि संशोधन सुरू केले. ओहियो विद्यापीठातील जैवरसायनतज्ज्ञ डॉ. मॉरिसिओ मॉटल यांच्यामुळे ते जीवशास्त्राकडे वळले. पुढे ते येल विद्यापीठात गेले. तिथे त्यांनी 'ई कोली' या जीवाणूमधील रायबोझोम्सचा अभ्यास केला. तेव्हापासून त्यांनी रायबोझोम्सचे गूढ उकलण्याचा ध्यास घेतला. या कामात त्यांना सहप्रवासी भेटले ते स्टिट्झ आणि योनाथ यांच्या रुपाने."**

केली- 'सलाम वालेकुम' म्हणत मुस्लिम जनतेशीही संवाद साधण्याचे पाऊल उचलले. त्यामुळेच की काय त्यांना शांततेसाठीचे 'नोबेल' मिळाले आहे; परंतु ते वादग्रस्त ठरले आहे. जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी ओबामांनी असे काय केले आहे, असा सवाल विचारला जात आहे. अर्थात शांततेसाठीचे नोबेल वादग्रस्त ठरण्याची ही काही पहिली वेळ नव्हे.

मानवाच्या रक्तरंजित संघर्षातून अनेक जीवांची होरपळ होते. कुणा एका हुकुमशहाच्या रक्तपिपासू वृत्तीमुळे लाखो- कोट्यवधी जनतेचे जीवन वेदनामय होते. ही वेदना किती तीव्र असते आणि जखम किती खोलवर असते याची अनेक उदाहरणे इतिहासाच्या पानापानावर मिळतात. संवेदनशील मने जेव्हा या वेदनांतून जातात तेव्हा त्यांना शब्द फुटतात आणि साहित्याची निर्मिती होत असते. या साहित्यातून येणारी अनुभूती प्रत्ययकारी असते आणि म्हणूनच ते मनाला भिडणारे असते. जर्मन लेखिका हेर्टा म्यूलर यांचे साहित्य अशाच प्रकारचे आहे. त्यामुळेच त्यांना यंदाचे साहित्यासाठीचे नोबेल पारितोषिक मिळाले आहे. मानवी जीवनात 'अर्था'ला वेगळा अर्थ आहे! भौतिक जगतातील सारे व्यवहार हे पैशावर होतात आणि या व्यवहारांमागे काही नियम असतात. अर्थात हे नियम काळानुरूप बदलत असतात, नवनवे अर्थ धारण करीत असतात. अनेकदा मानवी समूह वेगवेगळ्या प्रकारचे व्यवहार करून नवी यंत्रणा वा व्यवस्था निर्माण करीत असतात. या साऱ्यांचा बोध घेतल्यास अर्थव्यवहार समजणे सोपे जाते. तसे करणाऱ्यांनाही 'नोबेल' देण्याची पद्धत आहे. या वर्षी ऑलिव्हर विल्यमसन आणि एलिनॉर ऑस्ट्रम यांना ते मिळाले आहे. अर्थव्यवहारांच्या व्यवस्थापनाच्या आकलनाचे क्षेत्र समृद्ध बनविण्याचे संशोधन त्यांनी केले आहे. यंदाच्या तेरा नोबेल विजेत्यांमध्ये पाच महिला आहेत. हेही यंदाच्या नोबेल पारितोषिकांचे एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

## वैद्यकशास्त्र



एलिझाबेथ ब्लॅकबर्न, कॅरोल ग्राइडर आणि जॅक त्झोस्टॅक (तिघेही अमेरिकेचे) यांना वैद्यकशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले आहे. पेशींच्या



एलिझाबेथ ब्लॅकबर्न

विभाजनानंतर निर्माण होणाऱ्या नव्या पेशीत गुणसूत्रे जशीच्या तशी जाण्यासाठी टेलोमर नावाचे रेणू आवश्यक असतात. रंगगुणसूत्रांच्या रक्षण त्यांच्यामुळे होत असते. या रेणूबाबतचे सखोल संशोधन या तिघा शास्त्रज्ञांनी केले आहे. वार्धक्य लांबविण्यासाठी; तसेच हाडांमधील विकार, फुफ्फुसाचे विकार, त्वचाविकार, रक्तक्षय दूर करण्यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरणार आहे.

जीवसृष्टी ही पेशींनी बनलेली असते. या पेशींचे विभाजन होण्याची प्रक्रिया सतत चालू असते. विभाजनानंतर मूळ पेशीतील सर्व रंगगुणसूत्रे नव्या पेशींत जाणे गरजेचे असते. टेलोमर नावाचे रेणू हे काम करीत असतात. हे रेणू गुणसूत्रांच्या शेवटी असतात. टेलोमर कसा तयार होतो याचे संशोधन ब्लॅकबर्न आणि त्यांच्या शिष्या ग्राइडर यांनी केले. टेलोमरच्या निर्मितीला टेलोमरेज हा जैविक उत्प्रेरक (एंझाईम) कारणीभूत असल्याचे त्यांना आढळले आहे. टेट्राहायमेना या एकपेशीय सूक्ष्मजंतूच्या रंगगुणसूत्रांचा अभ्यास करताना ब्लॅकबर्न यांना टेलोमर या गुणसूत्र रक्षकांची माहिती झाली. त्याच दरम्यान जॅक त्झोस्टॅक



कॅरोल ग्राइडर


जॅक स्झोस्टॅक

यांच्याशी त्यांचा परिचय झाला. परस्परांचे संशोधन एकमेकांना पूरक असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी टेलोमर आणि टेलोमरेज यांचे कार्य समजून घेण्याचे संशोधन केले. कर्करोग झालेल्या रुग्णांमध्ये टेलोमरेजचे कार्य जोरात चालू असते. ते थांबविण्याचे तंत्र आता शोधता येऊ शकेल. तसे झाल्यास दूषित पेशींचे विभाजन थांबविता येईल. म्हातारपणात टेलोमरचे कार्य शिथील होते. त्यामुळे पेशींचे विभाजन मंदावते. अशा वेळी टेलोमरजेचे काम जोरात झाल्यास वार्धक्य लांबवता येऊ शकेल. या साऱ्यांमुळे ब्लॅकबर्न प्रभृतींचे संशोधन महत्त्वपूर्ण ठरते. म्हणूनच ते नोबलचे मानकरी ठरले आहेत.

ब्लॅकबर्न या मूळच्या ऑस्ट्रेलियाच्या. मेलबर्न विद्यापीठातून एमएस्सी आणि केंब्रिज विद्यापीठातून पीएच. डी. केल्यानंतर त्या अमेरिकेत गेल्या. सध्या त्या सॅन फ्रान्सिस्को येथे प्राध्यापक आहेत. ग्राइडर या मूळच्या अमेरिकेच्याच. सध्या त्या जॉन हाफकिन्स इन्स्टिट्यूटमध्ये प्राध्यापक आहेत. त्झोस्टॅक यांचा जन्म लंडनमधील. सध्या ते अमेरिकेतील हार्वर्ड मेडिकल स्कूलमध्ये प्राध्यापक आहेत.

## भौतिकशास्त्र



आजच्या जगाचे वर्णन 'वैश्विक खेडे' असे केले जाते. संदेश दळणवळण क्षेत्रात झालेल्या जगाला हे नवे विशेषण मिळाले आहे. इंटरनेटमुळे जगाच्या एका कोपऱ्यातून पाठवलेला संदेश क्षणार्धात दुसऱ्या कोपऱ्यात जाणे आज शक्य झाले आहे. इंटरनेटने तर एक नवे जगच निर्माण केले आहे. या जगतातील नागरिकांना 'नेटीझन्स' म्हटले जाते. कोणत्याही देशांतील कितीही मंडळी एकाच वेळी 'व्हिडिओ कॉन्फरन्सिंग'द्वारे एकमेकांना पाहत संवाद साधू शकतात. मोबाईल फोन तर आजच्या जीवनशैलीत एक अविभाज्य घटक बनून राहिला आहे. या साऱ्यांमुळे जगातील वेगवेगळे देश परस्परांच्या नजीक आले आहेत. म्हणूनच तर जगाला वैश्विक खेड्याची उपमा दिली जात आहे. संदेश दळणवळणाच्या क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाने ही सारी क्रांती घडविली आहे. या तंत्रज्ञानातील एक महत्त्वपूर्ण घटक म्हणजे ऑप्टिकल फायबर– काचतंतू. याच काचतंतूंबाबतच्या सैद्धान्तिक अभ्यासाबद्दल चार्ल्स क्रेन काओ, विलार्ड बॉइल आणि जॉर्ज एल्वूड स्मिथ यांना यंदाचे भौतिकशास्त्रासाठीचे पारितोषिक मिळाले आहे.


चार्ल्स क्रेन काओ

काचतंतूंमधून प्रकाशाचा वापर करून विविध प्रकारचे संदेश पाठविता येऊ शकतो, हे काओ यांनी अभ्यासाद्वारे सिद्ध केले. साठच्या दशकात त्यांनी याबाबतचा अभ्यास सुरू केला. त्यांच्या या अभ्यासानंतर 'फायबर ऑप्टिक्स' ही नवी शाखा भौतिकशास्त्रात सुरू झाली. या 'फायबर


विलार्ड बॉइल



जॉर्ज एल्वूड स्मिथ

ऑप्टिक्स'मुळे आज जगात कोठेही आणि कोठूनही आवाज, संगीत, संगीत, चित्रपट, मजकूर पाठविता येणे शक्य झाले आहे. काचतंतूमधील सिग्नलच्या संदेशाचे आकलन होण्यासाठी योग्य इलेक्ट्रॉनिक यंत्रणा म्हणजे सर्किट हवे. हे संदेश डिजिटल म्हणजे शून्य आणि एक या दोन अंकातच असतात. या डिजिटल म्हणजे अंकीय स्वरुपातील संदेशाचे रुपांतर आवाजात, चित्रात किंवा मजकुरात करण्यासाठीचे काम स्मिथ आणि बॉइल यांनी केले. त्यासाठी त्यांनी 'चार्ज कपल डिव्हाइस' ही यंत्रणा विकसित केली. ती आता इमेजिंग टेक्नॉलाजी म्हणून प्रसिद्ध आहे. अर्थात प्रकाशाचे विद्युत संदेशात रुपांतर करण्याचे श्रेय अल्बर्ट आइनस्टाईन यांना जाते. फोटो इलेक्ट्रिक इफेक्टचा म्हणजे प्रकाशकणांचे विद्युकशक्तीत रुपांतर होणाऱ्या परिणामाचा शोध त्यांनी लावला होता. त्यासाठी १९२१ मध्ये त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले होते.

चार्ल्स काओ हे मूळचे चीनचे. १९३३ चा त्यांचा जन्म. १९६५ मध्ये इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग या विषयात त्यांनी पीएच. डी. मिळवली. ब्रिटनमधील स्टँडर्ड टेलिकम्युनिकेशन संस्थेचे ते संचालक होते. चायनीज युनिव्हर्सिटी ऑफ हाँगकाँगचे ते कुलगुरूही होते. बॉईल हे कॅनडाचे आहेत. पण त्यांच्याकडे अमेरिकेचेही नागरिकत्व आहे. न्यूजर्सी येथील बेल लॅबोरेटरीमधील कम्युनिकेशन सायन्सचे कार्यकारी संचालक होते. स्मिथ हे मूळचे अमेरिकेचेच. १९८६ मध्ये ते बेल लॅबोरेटरीमधून निवृत्त झाले.

# रसायनशास्त्र



'डीएनए' म्हटले की वेटोळ्यांमधील त्यांचे चित्र सर्वांच्या समोर येते. या 'डीएनए'च्या शोधाने जीवशास्त्राचे आकलन अधिक सुस्पष्टपणे होत गेले. म्हणूनच 'डीएनए'चा शोध आजही महत्त्वपूर्ण मानले जाते. सजीवांच्या प्रत्येक पेशींमध्ये 'डीएनए'चे रेणू असतात. सजीवाच्या कार्याबद्दलची माहिती– त्याची 'ब्लू प्रिंट'च म्हणा– 'डीएनए'मध्ये असते. असे असले, तरी स्वतः 'डीएनए' काही करीत नसतात. ते निष्क्रिय असतात. त्यांच्यातील माहितीला कृतीचे रूप देण्याचे काम रायबोझोम्स करीत असतात. रायबोझोम्स हे 'डीएनए'मधील माहिती कृतीत आणून प्रथिने तयार करीत असतात. म्हणूनच त्यांनी प्रथिनांचे कारखाने म्हटले जाते. या रायबोझोम्सच्या अभ्यासाबद्दल वेंकटरमण रामकृष्णन, थॉमस स्टिट्झ आणि



वेंकटरमण रामकृष्णन



थॉमस स्टिट्झ

अदा योनाथ यांना यंदाचे रसायनशास्त्रासाठीचे नोबेल पारितोषिक मिळाले आहे.

रायबोझोम्स प्रथिने तयार करीत असतात. हिमोग्लोबीन, प्रतिकारशक्तीसाठीचे प्रतिजीव, इन्शुलीनसारखी संप्रेरके हे सारे काही रायबोझोम्सवर घडत असतात. या रायबोझोम्सवर प्रथिने बनण्याची प्रक्रिया कशी घडते हे पाहणे म्हणूनच महत्त्वाचे ठरते. साध्या सूक्ष्मदर्शकातून हे पाहता येत नाही. त्यासाठी 'एक्स रे क्रिस्टलोग्राफी'ची गरज असते. रामकृष्णन, स्टिट्झ आणि योनाथ या तिघांनी हे काम केले आहे. त्यांनी 'एक्स रे क्रिस्टलोग्राफी'द्वारा प्रथिने बनण्याच्या प्रक्रियेचे निरीक्षण केले आहे. त्याचबरोबर प्रतिजैविके रायबोझोम्सना कसे बांधतात, यांचे त्रिमिती प्रारूपही विकसित केले आहे. जीवसृष्टीच्या सुस्पष्ट आकलनासाठी त्यांचे हे संशोधन महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर नवी प्रतिजैविके बनविण्यासाठीही ते उपयुक्त आहे. या संशोधनामुळे रोगप्रतिबंधक औषधनिर्मितीला मदत होणार आहे. सध्या प्रतिजैविकांचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो; परंतु त्यामुळे काही उपयुक्त जीवाणूंचाही नाश होतो. या संशोधनामुळे असा नाश न करणारी नव्या प्रकारची प्रतिजैविके विकसित करण्यास मदत होऊ शकेल. थोडक्यात मानवी जीवन अधिक सुदृढ आणि निरोगी होण्यासाठी हे संशोधन उपयुक्त आहे.

रामकृष्णन हे मूळचे भारतीय. तमिळनाडूतील चिदंबरम येथे १९५२ मध्ये त्यांचा जन्म झाला. बडोदा विद्यापीठातून त्यांनी भौतिकशास्त्राची पदवी घेतली आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ते १९७१ अमेरिकेला गेले आणि शिक्षणानंतर तेथेच त्यांनी अध्यापन आणि संशोधन सुरू केले. ओहियो विद्यापीठातील जैवरसायनतज्ज्ञ डॉ. मॉरिसिओ माँटल यांच्यामुळे ते जीवशास्त्राकडे वळले. पुढे ते येल विद्यापीठात गेले. तिथे त्यांनी 'ई कोली' या जीवाणूमधील रायबोझोम्सचा अभ्यास केला. तेव्हापासून त्यांनी रायबोझोम्सचे गूढ उकलण्याचा ध्यास घेतला. या कामात त्यांना सहप्रवासी भेटले ते स्टिट्झ आणि योनाथ यांच्या रुपाने. स्टिट्झ हे येल विद्यापीठात, तर योनाथ या 'वाईजमन इंन्स्टिट्यूट'मध्ये आहेत. या तिघांनी मिळून रायबोझोम्सबद्दलची नवीन माहिती प्रकाशात आणली जीवशास्त्राचे आकलन आणखी सुस्पष्ट केले. रामकृष्णन यांना नोबेल मिळाल्याने भारतीयांना मोठा आनंद होणे स्वाभाविक आहे. मात्र, त्यांच्या शास्त्रज्ञांना वाव देणाऱ्या, त्यांना पुरेशा पायाभूत सुविधा देणाऱ्या प्रयोगशाळा आणि पोषक वातावरण देशात निर्माण होणे आवश्यक आहे. तसे झाल्यास कधी ना कधी भारतात राहणाऱ्या भारतीयाला नोबेल पारितोषिक मिळू शकेल.



अदा योनाथ

## साहित्य



जर्मन लेखिका हेर्टा म्यूलर या साहित्यासाठीच्या नोबेलच्या मानकरी ठरल्या आहेत. त्या वंशाने जर्मन आहेत; पण त्यांचा मूळ देश आहे रुमेनिया. दुसऱ्या महायुद्धानंतर संपूर्ण युरोपचीच अमेरिका आणि तत्कालीन सोव्हिएत संघाच्या गटात विभाजन झाले. रुमेनिया हा सोव्हिएत संघाच्या गटात होता. त्यामुळे तिथे साम्यवादी राजवट

होती. या राजवटीने हळूहळू दडपशाही सुरू केली आणि त्यात सर्वसामान्यांची होरपळ सुरू झाली. अनेकांना दंडूकशाहीचा त्रास होऊ लागला. हेर्टा यांच्या मातुश्रींनाही असाच त्रास झाला- पाच वर्षांसाठी त्यांची सोव्हिएत संघातील एका श्रमछावणीत रवानगी झाली. याचा परिणाम हेर्टा यांच्या आयुष्यावर झाला. पुढे त्या जेव्हा कामाला लागल्या, तेव्हा साम्यवादी राजवटीने खबरे बनण्यासाठी त्यांच्याकडे आग्रह धरला. मात्र, त्यांनी तो अव्हेरला. त्यामुळे त्यांना नोकरी गमवावी लागली. त्यानंतर त्या एकीकडे लेखन करू लागल्या आणि दुसरीकडे जर्मन भाषेच्या खासगी शिकवण्या करू लागल्या. १९८२ मध्ये त्यांनी पहिला कथासंग्रह प्रसिद्ध केला. मात्र, त्यांतील काही कथांमधील राजकीय भाष्याला रुमेनियातील सेन्सॉरने कात्री लावली. त्यामुळे या कथासंग्रहाची मूळ प्रत गुप्तमार्गाने जर्मनीत पाठवून त्यांनी तेथे ते प्रसिद्ध करून घेतले. रुमेनियातील दडपशाहीचे वर्णन करणाऱ्या या कथा जर्मनीत चांगल्याच गाजल्या. पुढे १९८७ मध्ये त्यांनी स्वतःच जर्मनीत स्थलांतर केले.


हेर्टा म्यूलर

रुमेनियातील साम्यवादी राजवटीत, चॉसेस्क्यूसारख्या हुकूमशहाच्या दडपशाहीमुळे तेथील सामान्य माणूस कसा भरडला जात आहे याचे चित्रण हेर्टा यांच्या अनेक साहित्यकृतींत आहे. 'लँड ऑफ ग्रीन पीस', 'आटेशाऊकेल' आदी त्यांच्या साहित्यकृतींनी साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेतले. रुमेनियातील स्वातंत्र्याला आसुलेल्या समाजाच्या वेदना त्यांनी या कृतींद्वारे मांडल्या. त्यांच्या बहुतेक लेखनात राजकीय भाष्य आहे. तसे असणे स्वाभाविकही आहे. त्याची बीजे रुमेनियामधील त्यांच्या जडण-घडणीत आहेत. त्यांच्या स्वातंत्र्यप्रेमी वृत्तीचे प्रतिबिंबही त्यांच्या साहित्यामध्ये पडते. अशा या हेर्टा म्यूलर यांची नोबलेसाठी झालेली निवड सार्थच असल्याचे जाणकार म्हणूनच सांगत आहेत.

# शांतता

हेर्टा म्यूलर यांना साहित्यातील नोबेल मिळाल्याबद्दल वाद निर्माण झाला नाही. शांततेसाठी जाहीर



झालेल्या नोबेल पारितोषिकाने मात्र हा वाद निर्माण केला. अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांना हे पारितोषिक मिळाले आहे. ओबामा हे कमालीचे लोकप्रिय आहेत. ते केवळ अमेरिकेच लोकप्रिय आहेत, असे नाही, तर जगातही लोकप्रिय आहेत. बदलाची भाषा करणाऱ्या या कृष्णवर्णीय अध्यक्षाचे अनेक प्रशंसक जगभर आहेत. अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत उतरल्यापासून साऱ्या जगाचे लक्ष त्यांच्यावर केंद्रीत झाले. डेमोक्रेटिक पक्षाच्या उमेदवारीसाठी त्यांच्यात आणि हिलरी क्लिंटन यांच्या कमालीची चुरस होती; पण 'चेंज वुई कॅन' असा नारा देणारे ओबामांनी हिलरींवर मात केली. प्रत्यक्ष निवडणुकीत त्यांच्या समोर असलेले रिपब्लिकन पक्षाचे जॉन मॅक्केन यांनी फारसे आव्हान दिलेच नाही. त्यामुळे निवडणूक जिंकत बराक ओबामा यांनी इतिहास घडविला.

अध्यक्षपदाची सूत्रे घेतल्यानंतर त्यांनी काही पावले उचलत आशा निर्माण केली. काही चांगली भाषणे केली. मुस्लिम जगताशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. गांधीजींबद्दलची आत्मीयता व्यक्त केली. मात्र, या साऱ्याला त्यांनी कृतीची जोड दिली नाही. त्यांनी गेल्या दहा महिन्यांत काहीतरी क्रांतिकारी कार्य केले आहे, असे नाही. किंवा इराक, इराण, अफगाणिस्तान, पाकिस्तान, इस्राईल-


बराक ओबामा

पॅलेस्टाईन या देशांबाबतच्या अमेरिकेच्या धोरणांत मोठा बदल केला आहे, असेही नाही.

अफगाणिस्तानमधील अमेरिकेचे दहशतवाद्यांविरुद्धचे युद्ध चालूच आहे. दहशतवाद्यांना खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानला आर्थिक मदत देण्याचे धोरणही त्यांनी कायम ठेवले आहे. असे असताना त्यांना शांततेसाठीचे नोबेल पारितोषिक मिळाल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे. खुद्द अमेरिकेतही अशीच प्रतिक्रिया उमटली. आता कोठे ओबामांची कारकीर्द सुरू झालीय; शांततेसाठीची भाषा ते करीत असले, तरी त्याला कृतीची जोड नाही. त्यामुळे ते नोबेलसाठी पात्र नाहीत, अशा प्रकारचे भाष्य तेथील काही वृत्तपत्रांत आणि नियतकालिकांत आले. ओबामांचा हेतू चांगला आहे; परंतु केवळ हेतू चांगला म्हणून नोबेल देणे योग्य नाही, अशी परखड टीकाही काही स्तंभलेखकांनी केली. शांततेसाठीचे नोबेल अनेकदा वादग्रस्त ठरते. यंदाचे पारितोषिकही त्याला अपवाद ठरले नाही, हेच खरे.

## अर्थशास्त्र



अमेरिकी अर्थतज्ज्ञ ऑलिव्हर विल्यमसन आणि एलिनॉर ऑस्ट्रम हे अर्थशास्त्राच्या नोबेलचे मानकरी आहेत. जंगले, खनिज संपत्ती, जलाशय, पर्यावरण आदींसारख्या सामायिक उपभोगाच्या आणि सामुदायिक मालकीच्या साधनसंपत्तीचे व्यवस्थापन तिच्याशी जैविकरित्या जोडले गेलेले लोकच सरकार किंवा खासगी कंपन्यांपेक्षा अधिक परिणामकारकतेने करू शकतात, असा निष्कर्ष या दोघांनी त्यांच्या अभ्यासाद्वारे काढला आहे.



एलिनॉर ऑस्ट्रम



ऑलिव्हर विल्यमसन

अर्थात याची प्रचिती आपल्याकडे आपण घेत आहोतच. जंगलात राहणारे आदिवासी जंगलाची जितकी चांगली काळजी घेतात, तितकी इतरांना जमत नाही. त्यांचे जीवन जंगलातील साधनांवर अवलंबून असते हे खरे; परंतु जंगलाला मोठ्या प्रमाणावर हानी पोहोचेल अशी कोणतीही कृती ते करीत नसतात. हीच बाब विल्यमसन आणि ऑस्ट्रम यांनी मांडली आहे. खासगीकरणाचे भले-बुरे अनुभव सर्वच जण घेत असतात. खासगीकरणाची प्रक्रिया वेगाने सुरू झाल्यानंतर तिची भलावण करणारे खुल्या बाजारपेठेच्या अनिर्बंध स्वयंचलनाकडे दुर्लक्ष करू लागले. खासगीकरणाला विरोध करणारे नियंत्रणाची भाषा करतात, तर त्याचे समर्थक अनिर्बंध स्वातंत्र्याची गरज व्यक्त करतात. प्रत्यक्षात या दोहोंचा सुवर्णमध्य गाठण्याची गरज असते. सामुदायिक मालकीच्या साधनसंपत्तीसाठी हा सुवर्णमध्य किती महत्त्वाचा आहे हे विल्यमसन आणि ऑस्ट्रम यांनी दाखवून दिले आहे. अनिर्बंध स्वातंत्र्यामुळे काय परिणाम होतात हे अमेरिकेतील गेल्या वर्षामधील आर्थिक घटनांनी दाखवून दिले आहे. त्यामुळे विल्यमसन आणि ऑस्ट्रम यांचे संशोधन अधिक महत्त्वाचे ठरते. त्यांना पारितोषिक देऊन नोबेलच्या पंचांनी त्यांची योग्य दखल घेतली आहे.

(संदर्भ : नोबेल पारितोषिकाची वेबसाइट, सकाळ आणि अन्य वृत्तपत्रे)

■■■



# नवीन सरकारकडून महाराष्ट्रातील जनतेच्या अपेक्षा

शब्दांकन : डॉ. सुधीर भोंगळे

महाराष्ट्रातील जनतेने पुन्हा एकदा मोठ्या आशेने व विश्वासाने राज्याची सत्ता काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच्या हाती सुपूर्त केली आहे. गेली दहा वर्षे राज्यात ही आघाडी सत्तेवर असून तिने विकासाचे बरेच काम केले असले तरी अजुनही बरेच काम शिल्लक आहे आणि विशेष म्हणजे महाराष्ट्र हे देशातील सर्वच क्षेत्रातील अग्रेसर असणारे राज्य ठरावे अशी जी राजकीय-सामाजिक क्षेत्रातील धुरीणांची संकल्पना व स्वप्न होते त्यापर्यंत आपण अजून पूर्णपणाने पोहोचू शकलेलो नाही. मराठी भाषिकांचे स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्माण झाले त्याला २०१० मध्ये ५० वर्षे होत आहेत. त्या निमित्ताने सुवर्णमहोत्सवाचे कार्यक्रमही राज्यभर साजरे होतील. पण या सुवर्णमहोत्सवी आनंदाच्या गदारोळात आपल्या राज्यकर्त्यांचे महाराष्ट्राच्या मुळ प्रश्नांकडे लक्ष जाईल की नाही याची भिती अनेक जाणकारांच्या आणि चिंतकांच्या मनात घर करून बसलेली आहे. नव्याने सत्तेवर आरुढ झालेल्या या आघाडी सरकारकडून जनतेच्या खूप काही अपेक्षा व आशा आहेत. त्यातील भारताचे माजी कॅबिनेट सचिव आणि पंतप्रधान राजीव गांधींचे तत्कालीन प्रधान सचिव बी. जी. देशमुख, भारताच्या जलसंपदा विभागाचे निवृत्त केंद्रीय सचिव आणि दक्षिण आशियाई ग्लोबल वॉटर पार्टनरशिपचे माजी अध्यक्ष व आंतरराष्ट्रीय किर्तीचे जलतज्ज्ञ डॉ. माधवराव चितळे आणि फोर्जिंग व्यवसायातील जगातील नामवंत उद्योजक व भारत फोर्ज कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. बाबासाहेब कल्याणी या तीन नामवंत व्यक्तिंची मते व विचार या लेखात नमूद करीत आहोत.

# सॅटेलाईट टाऊन्स् उभारावीत

**भालचंद्र देशमुख**
निवृत्त कॅबिनेट सचिव व
पंतप्रधान राजीव गांधी यांचे माजी प्रधान सचिव,



महाराष्ट्रातील शहरे आणि ग्रामीण विभाग यांचे प्रश्न निरनिराळे आहेत ते आपण ध्यानात ठेवले पाहिजेत. नुसत्या शहरी विभागांवर लक्ष ठेऊन चालणार नाही. कारण बहुसंख्य लोक ग्रामीण भागात राहतात. पण शहरी विभागांकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. कारण शहरे ही रोजगार आणि संपत्ती (Employment & Wealth) निर्माण करतात तेव्हा या दोघांचा समन्वय करून तसा विकासाचा सांगाडा तयार केला पाहिजे.

ग्रामीण विभागाचा विचार केला तर शेती हा महत्वाचा प्रश्न आहे आणि महाराष्ट्रातील सिंचनाचे प्रमाण आज जेमतेम १४ ते १६ टक्क्यांच्या आसपास आहे. ते जास्तीत जास्त कसे वाढविता येईल याचा विचार केला पाहिजे. त्याचबरोबर सिंचनाचे पाणी योग्य रितीने कसे वापरावे याचे शिक्षणही लोकांना मिळेल अशी व्यवस्था केली पाहिजे म्हणजे विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा योग्य रितीने वापर होऊ शकेल. या सर्व पाण्याचे संधारण व साठवणही योग्य पद्धतीने झाली पाहिजे. उपलब्ध होणारे सर्व पाणी सिंचनासाठी वापरले तरी महाराष्ट्रातील फक्त २५ ते ३० टक्के जमिनच ओलिताखाली येऊ शकणार आहे. म्हणजे याचा दुसरा अर्थ असा आहे की ७० ते ७५ टक्के जमीन ही कायम कोरडवाहू, जिरायत व निसर्गाच्या लहरीवर अवलंबून राहणार आहे. या शेतीला चारमाही किंवा आठमाही सिंचनाची सोय करता आली पाहिजे म्हणून पाणलोट क्षेत्र विकासाचा कार्यक्रम राबविण्यावर आपण भर दिला पाहिजे. या कार्यक्रमांतर्गत ठिकठिकाणी

बंधारे घालणे, शेततळी तयार करणे, सीसीटी, कंटुरबंडिंग, टेरेसिंग, मृद व जलसंधारण, वनीकरण यासारखे वेगवेगळे उपक्रम शास्त्रीय पद्धतीने माथा ते पायथा या तत्त्वावरती पूर्ण केले पाहिजेत. या जलसंधारणाच्या कार्यक्रमासाठी केंद्र व राज्य सरकारने अनेक चांगल्या व लोकांना प्रोत्साहन मिळेल अशा योजना तयार केल्या पाहिजेत आणि त्या योजना लोकांपर्यंत व्यवस्थितपणे पोहोचविल्या पाहिजेत. चांगले बी-बियाणे योग्य दरात शेतकऱ्यांना कसे मिळेल याचाही विचार झाला पाहिजे. मग पुढचा प्रश्न येतो कर्जाचा. याबाबत जाहिरनाम्यात जी काही वचने दिलेली आहेत ती पूर्ण करावीत त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला योग्य भाव कसा मिळेल, आधारभूत किंमती किती द्याव्यात याचा विचार करून अन्नधान्याची साठवण करण्याची मोठी आधुनिक व्यवस्था केली पाहिजे. अन्न प्रक्रिया उद्योगालाही उत्तेजन देऊन शक्यतो ज्या ठिकाणी कच्च्या मालाचे उत्पादन होते तिथेच त्यावर प्रक्रिया करणारी कारखानदारी उभी केली पाहिजे हेच आमच्या पाणलोट क्षेत्र विकासाच्या कार्यक्रमाचे अंतिम ध्येय आहे. हे सगळे करतांना विविध विभागात राहणाऱ्या लोकांना शिक्षण आणि आरोग्य याबाबतच्या सेवाही चांगल्या कशी मिळतील याचा विचार केला पाहिजे. नॅशनल रूरल हेल्थ मिशनची योग्य पद्धतीने अंमलबजावणी केली पाहिजे. शिक्षण देतानासुद्धा अनौपचारिक व व्यावसायिक शिक्षणावर भर दिला पाहिजे. पुरुष व महिलांचे सेल्फ हेल्प ग्रुप स्थापन करून ते व्यवस्थित कसे चालतील हे पाहिले पाहिजे. आज महिला जे पैसे कमवितात त्या बुहतेक कुटूंबासाठी वापरतात आणि पुरुषांचा निम्मा पैसा व्यसनात व चैनीत जातो. शहरांकडे पाहिले तर तिथेसुद्धा रोजगाराच्या संधी कशा वाढतील, औद्योगीकरण कसे करता येईल, नवीन उद्योगांना जागा, कर्ज, विजेचा पुरवठा, तांत्रिक कौशल्य लाभलेले कामगार आणि उच्चशिक्षित मजुरांचा पुरवठा कसा होऊ शकेल यादृष्टीने नियोजन करावे लागेल. शहरात मुख्य अडचण निवास आणि वाहतुक यांची आहे. झोपडपट्टी सुधारणा हा कार्यक्रम जरी सरकार राबवित असले तरी त्यापेक्षाही झोपडपट्ट्या होणारच नाहीत अशी काळजी घेणं जास्त महत्वाचं व गरजेचं आहे. आणि त्या दृष्टीने सॅटेलाईट टाऊन्स स्थापन करायला हवीत.

पुणे शहराचेच उदाहरण घेऊ. पुणे शहराच्या भोवती तळेगांव, दौड, बारामती, इंदापूर ही गावे सॅटेलाईट टाऊन्स म्हणून आपण विकसीत करायला काय हरकत आहे ? मुंबईच्या शेजारी असणारा कर्जत, कल्याण, वसई, शहापूरचा भागही अशाच पद्धतीने विकसीत करता येईल जेणेकरून लोक मुंबईला न जाता तिथेच राहतील. असा प्रयोग गुजरातमध्ये अहमदाबादच्या जवळ सुरू करण्यात आला असून अशी सॅटेलाइट टाऊन्स उभी करण्यात येत आहेत. आज पुण्याजवळचे चाकण हे गाव सुधारतयं. पण त्याचे टाऊन प्लॅनिंगच होत नाही. ज्या गावांचा अशा पद्धतीने विकास करायचा आहे तिथे शाळा, मॉल्स, दवाखाने, क्लब्ज व इतर शहरात असणाऱ्या सर्व सोयीसुविधा निर्माण केल्या पाहिजेत. आता या गोष्टी बोलतांना आपण प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्राचाच विचार करतो. पण मराठवाडा आणि विदर्भाचे प्रश्न निराळे आहेत. मराठवाडा हा जास्त मागास आहे. आणि पाणी उपलब्धतेच्या दृष्टीने बराच भाग तुटवड्याचा आहे. विदर्भ आपल्यापासून बराच लांब आहे. त्यांचे प्रश्न निरनिराळ्या पद्धतीने हाताळावे लागतील.

बऱ्याच ठिकाणी मागे दुष्काळ पडला होता. पण जिथे दुग्धोत्पादनाचा व्यवसाय विकसीत झालेला होता तिथे लोक तग धरून राहिले आणि दुष्काळाची फारशी झळ त्यांना पोहोचली नाही. राज्यात सर्वत्र डेअरी, पोल्ट्री हे व्यवसाय वाढविण्याचा कार्यक्रम मोहिम म्हणून सरकारने हाती घेतला पाहिजे. ज्या जमिनीवर महाराष्ट्रात शेती होऊ शकत नाही आणि जो भाग वर्षानुवर्षे कोरडा, माळरान म्हणून पडलेला आहे तिथे 'एसईझेड' स्थापन करावे म्हणजे शेतमालकांचे आंदोलनही कमी होईल. सॅटेलाईट टाऊन्सच्या जवळच एसईझेड केली तर लोक शहरात स्थलांतरीत होण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही.

ग्रामीण भागात उद्योग वाढीला लागावेत आणि तालुक्याचे गांव हे विकासाचे एक उत्कृष्ट मॉडेल ठरावे या पद्धतीने बारामती शहराचा विकास करण्यात आलेला आहे. आज अहमदनगरही चांगले विकसीत होत आहे. राजगुरुनगर, सिन्नर, चाकण ही गावेही विकासाच्या मार्गावर आहेत. विकासाचा हा वेग लक्षात घेऊन बारामतीसह या सर्व गावांमध्ये सॅटेलाईट टाऊन्स, उद्योग यांची उभारणी करण्याकडे लक्ष देऊन पाणलोट क्षेत्र विकासाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविला पाहिजे.

# पाणी आरक्षणाची चर्चा तातडीची

**डॉ. माधवराव चितळे**
निवृत्त केंद्रीय जलसपंदा सचिव
आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जलतज्ज्ञ



काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीने विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जो निवडणूक जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे त्यातून समाजाच्या पुढच्या वाटचालीचा संदर्भबिंदू आता उपलब्ध झाला आहे. हा जाहिरनामा प्रसिद्ध केल्याबद्दल अगोदर आघाडीचे मनःपूर्वक अभिनंदन. या जाहिरनाम्याची चांगली प्रभा म्हणजे ताबडतोबीचा कार्यक्रम कसा राबविला जाणार हे येत्या २६ जानेवारीपर्यंत जाहिर करावे आणि प्रत्येक मुद्द्याला अनुसरून पाच वर्षांचा कार्यक्रम करता आला तर त्याला विधायक व चांगले स्वरूप प्राप्त होऊन तो पूर्णत्वाच्या दिशेने जाऊ शकेल इतकेच नव्हे तर शासकीय कामकाज करण्यासंबंधीची एक चांगली पद्धत त्या निमित्ताने पाडता येईल आणि दरवर्षी प्रजासत्ताकदिनी गेल्या वर्षभरात आपण ठरविलेल्या उद्दिष्टाच्या कितपत काम करू शकलो किंवा किती यश मिळवू शकलो याचा ताळेबंद मांडता येईल. त्यातून जो अनुभव व निष्कर्ष समोर येईल तो दरवर्षी प्रसिद्ध करण्याचे ठरविले तर चांगला पायंडा पडेल. विकासकामे करतांना कोणकोणत्या अडचणी व समस्या येतात त्यांची सोडवणूक कशी केली पाहिजे ? आणि विविध संस्था, संघटना, व्यक्ती यांनी त्या अडचणी सोडविण्याच्या कामात कसे सहभागी झाले पाहिजे यासंबंधीचे चित्र स्पष्ट होऊ शकेल. आपल्या प्रजासत्ताकाची मूळ संकल्पना सर्व लोकांना बरोबर घेऊन जाऊन काम करण्याची आहे. तीही त्यामुळे साध्य होऊ शकेल.

जाहिरनाम्यात जे मुख्य वचन दिलेले आहे ते समाजाला भयमुक्त करण्याचे. तो तातडीचा प्रश्न बनला आहे. रोजची वर्तमानपत्रे उघडल्यानतंर खून, दरोडे, बलात्कार, चोऱ्या, गुंडगिरी, नक्षलवादी कारवाया, अतिरेकी हल्ले यासारखे विषय समोर येतात. त्यावर शासन नियंत्रण कसे ठेवणार आहे. आवश्यकता आहे. या सर्व प्रश्नांमुळे समाजात आज खुप मोठा ताण-तणाव व धोका निर्माण झाला आहे. दोन्ही बाजूंनी स्पष्टपणे पावले टाकली गेली तरच आपण दृष्ट लोकांवर नियंत्रण मिळवू शकणार आहोत. वस्तीशः आपण सुरक्षा व्यवस्था उभी करणार आहोत की गस्त घालणारी पोलीस यंत्रणा उभी करणार आहोत याबाबतचे सुतोवाच झाले पाहिजे. आज पोलीस यंत्रणेशी समाजाचा काहीही संपर्क राहिलेला नाही. चांगला माणूस तर पोलिसांच्या जवळही जात नाही अशी परिस्थिती आहे. आपण भयमुक्त समाज कसा निर्माण करणार त्याचा तपशील जाहीर करण्याची आवश्यकता आहे. हा व्यापक राष्ट्रीय पक्ष आहे. नक्षलवाद, आतंकवाद या प्रश्नांपासून सामान्य माणसाला भयमुक्त करून दृष्ट प्रवृत्तीच्या माणसांवर तातडीने नियंत्रण आणण्याचा कार्यक्रम हाती घ्यावा लागणार आहे.

यावर्षी पुरेसा पाऊस झालेला नसल्यामुळे अवर्षणाचा प्रभाव सगळीकडे जाणवणार आहे. त्याला तोंड देण्याच्या दृष्टीने तयारी करण्यापूर्वी पाणलोट क्षेत्रशः भुजलाची स्थिती व चाऱ्याच्या साठ्याची परिस्थिती काय आहे याबाबतचा अभ्यास केला पाहिजे. यासंदर्भात पुढच्या आषाढापर्यंतचे पाणी वापराचे नियोजन काय व कसे व्हायला पाहिजे याचा विचार होण्यासाठी पाणलोट क्षेत्रशः विचारविनीमय करण्यासाठी बैठका सुरु केल्या पाहिजेत. त्या त्या पाणलोटातील

ग्रामपंचायतींना एकत्र आणून हा विचार केला पाहिजे.

यापुढील काळात अधिक संवेदनाक्षम असा मुद्दा हाताळावा लागणार आहे तो म्हणजे धरणातील पाणीसाठ्याचे आरक्षण करण्याचा. शहरे व मोठ्या गावांसाठी पाण्याचे नागरी आरक्षण बेधडकपणे करून टाकले जात आहे. त्यामुळे कृषी जीवनात असंतोष व मोठी नाराजी आहे. नगरांनी व शहरांनीही काही पाण्याची काटछाट स्वीकारली पाहिजे. जायकवाडी, उजनी यासारख्या सर्व मोठ्या धरणांमध्ये हा प्रश्न आता येणार आहे. त्यामुळे संबंधित सर्व घटकांमध्ये या पाणी वापराची व आरक्षणाची चर्चा कशी सुरू होईल हे शासनाने पाहिले पाहिजे. लघु पाणलोट निहाय नियोजन करून टँकरने कमीत कमी पाणी कसे वाहतुक करून आणावे लागेल याचा विचार केला पाहिजे कारण टँकरवरती मोठ्या प्रमाणात अनाठायी खर्च होतो. पशुधन जगविणे व मानवी वस्तीला स्थलांतरीत व्हावे लागू नये म्हणून जेवढी गरज असेल तेवढेच पाण्याचे आरक्षण केले पाहिजे. प्राथमिक पाऊल म्हणून आरक्षण चांगले नाही. त्यापेक्षा पाणी वापराचे नियोजन, काटकसर, गरजा कमी करणे हे जास्त महत्वाचे आहे.

जाहिरनाम्यामध्ये दारिद्र्य निर्मूलन, औद्योगिक विकास, शिक्षण या तीनही ठिकाणी रोजगाराचा उल्लेख केलेला आहे. परंतु रोजगार केंद्रीत सामाजिक, आर्थिक व्यवस्था हा मुद्दा जितक्या घट्टपणे मांडायला पाहिजे होता तेवढा प्रभावीपणे मांडलेला नाही. वाढती बेकारी व त्यामुळे निर्माण होत असलेली परिस्थिती याला प्रतिबंध करण्यासाठी तातडीने बेरोजगारीचा विषय हाती घ्यावाच लागेल. यासंदर्भात आपण उलट्या दिशेनेदेखील काही विचार केला पाहिजे. उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचा सर्वोत्तम उपयोग पुढच्या पाच वर्षात कसा करता येईल, त्यांच्याकडून कोणते काम करून घेता येईल याचे नियोजन केले पाहिजे. मनुष्यबळ ही पहिला आधाररेषा असली पाहिजे. शिक्षण, आरोग्य व अशा वेगवेगळ्या क्षेत्रात या मनुष्यबळाचा कसा उपयोग करून घेता येईल आणि जीवनाच्या वेगवेगळ्या अंगांना त्यातून कसा स्पर्श होईल याचा विचार केला पाहिजे. सुदैवाने महाराष्ट्रात आपण मानव संसाधन विकासाचा कार्यक्रम राबवितो तो या संदर्भात राबवायला हवा.

मनुष्यबळाची क्षमता लक्षात घेऊन भूजलाची पाहणी व आखणी करणे हे काम हाती घेता येईल. सगळ्यांना एकदम भूजल तज्ज्ञ बनविणे शक्य नाही. पण प्रमाणपत्रीत सहाय्यक बनविण्यासाठी दोन-तीन महिन्यांचे छोटे-छोटे अभ्यासक्रम सुरू करून त्यांना कामात जोडता येईल. अनेक गावांचे अजून समतल रेषांचे नकाशे नाहीत. ग्रामीण जीवनाचे नकाशे नाहीत. मनुष्यशक्तीचा उपयोग करू शकणारे हे सर्व उपक्रम आहेत. सगळीकडे उच्च तंत्रज्ञान वापरून हे होईल याची वाट न पाहता नियोजनाची आखणी केली पाहिजे. मनुष्यशक्ती आपण कशी वापरणार याचे अंदाजपत्रक शासनाने आता तयार करायला घेतले पाहिजे. काही जिल्ह्यात उदा. गडचिरोली - तिथे परिचारिका, रक्त-लघवी तपासणारे लोकही पुरेसे नाहीत ही उणीव लक्षात येईल. काही भागात दुग्धोत्पादन वाढवायचे ठरविले तर तिथे या धंद्यासंबंधीची पुरेशी माहिती असणारी जाणकार मुले उपलब्ध नाहीत असे आढळून येते. आत्तापासूनच या तरुणांना तीन-सहा-नऊ महिन्यांचे अभ्यासक्रम सुरू करून या धंद्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे तरच जाहिरनाम्यातील उद्दिष्ट्ये साध्य करता येतील.

सर्वात मोठी अडचण उर्जेची आहे. हा प्रश्न दिवसेंदिवस अवघड होत जाणार आहे. आत्तापर्यंत आपण केंद्रीत ऊर्जा निर्मितीचा विचार करून त्यावर भर देत राहिलो. त्या दृष्टीने औष्णिक व अणुऊर्जा प्रकल्प उभारले. पण त्याच्या बरोबरीने स्थानीक उर्जेचे स्रोत मात्र उपेक्षित ठेवले. ही मोठी दुदैवाची गोष्ट आहे. यासंबंधातील बोलके उदाहरण म्हणून कोल्हापूर जिल्ह्यातील चिकोत्रा धरणाचा उल्लेख करता येईल. या चिकोत्रा धरणातून व खोऱ्यातून जवळपास रोज दोन मेगॅवॅट वीज निर्माण होऊ शकेल एवढे पाणी वाहून जात आहे. गेल्या आठ वर्षांपासून या ठिकाणी वीजनिर्मितीसाठी जनित्रे बसविण्याचे काम रेंगाळलेले आहे. गोदावरीतही मोठमोठे बंधारे व बॅरेजेस बांधण्याचा कार्यक्रम चालू आहे. पण तिथेही वीज निर्मितीसाठी जनित्रे ठेवण्याची व्यवस्था केलेली नाही. ती करणे सहज शक्य आहे. विकेंद्रीत ऊर्जेची व्यवस्था शासनाने ताबडतोब उपलब्ध होईल या दृष्टीने कार्यक्रम आखून स्थानिक ऊर्जा लगेचच गावांना देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यातून रोजगार वाढेल. स्थानिक लोकांची विजेची गरज भागेल. राज्य शासन तातडीने या कामांकडे लक्ष देईल अशी आशा आहे.

# इन्फ्रास्ट्रक्चरची उभारणी महत्त्वाची

**बाबासाहेब कल्याणी**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
भारत फोर्ज लि व नामवंत उद्योजक



वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या गेले पाच दिवस चालू असलेल्या बैठकीला उपस्थित राहून मी दहा नोव्हेंबरला पुण्याला परत आलो आहे. जगाच्या, भारताच्या आणि आपल्या राज्याच्या दृष्टीने जे तीन-चार महत्वाचे मुद्दे आहेत त्यावर या फोरममध्ये चर्चा झालेली आहे. या मुद्द्यांची सोडवणूक करण्यासाठी केंद्र व राज्याच्या पातळीवर इतकेच नव्हे तर सर्व स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरीक यांनी एकत्रित येऊन एक प्रत्यक्ष कृती कार्यक्रम आराखडा तयार केला पाहिजे. आणि संपूर्ण देशाने त्या कार्यक्रमाच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे अशी आपली अपेक्षा आहे.

देशात ३०० ते ४०० दशलक्ष लोक (३० ते ४० कोटी) दारिद्य रेषेखाली राहात असून अनेकदा उपाशी पोटी झोपत आहेत किंवा एकवेळेला काहीतरी खाऊन कसेबसे जीवन जगत आहेत. या सर्व लोकांना दारिद्य रेषेच्या वर आणावयाचे असेल तर एकूण देशांतर्गत उत्पादनाचा दर हा किमान ९ टक्के तरी राहिला पाहिजे अशी अपेक्षा व आग्रह आपले पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग हे सातत्याने धरीत आहेत. हा विकास साधावयाचा असेल तर मूलभूत आणि पायाभूत सोयी-सुविधांची उभारणी (इन्फ्रास्ट्रक्टर), विजेचा गरजेइतका पुरवठा आणि उद्योगधंद्यांचा जो अनुशेष निर्माण झालेला आहे तो दूर करण्याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. विकासाचा अपेक्षित दर गाठावयाचा असेल तर जीडीपीमध्ये उद्योगधंद्यांचा वाटा ३० टक्के असला पाहिजे. आज तो फक्त १७ टक्के आहे. हा वाटा वाढविण्यासाठी सरकारला फार मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करावी लागणार आहे. ही गुंतवणूक मुख्यत्वे इन्फ्रास्ट्रक्चर रस्ते, वीज, सिंचन, शिक्षण, आरोग्य या सगळ्या क्षेत्रात करून काही गोष्टींची पूर्तता करणे आवश्यक

आहे.

सुदैवाने ही गुंतवणूक वाया जाणार नाही. कारण या इन्फ्रास्ट्रक्चरसाठी लोकांची व गुंतवणूकदारांची मोठी मागणी आहे. त्यासाठी पैसे द्यायला लोक तयार आहेत. रस्त्याच्या टोलचेच उदाहरण याबाबतीत पुरेसे बोलके आहे. आज बहुतेक सर्व लोक पुणे-मुंबई एक्सप्रेस हायवेचा टोल द्यायला स्वतःहून तयार असतात याचा अनुभव आपण घेत आहोत. लोकांकडून मागणी असल्याने हे इन्फ्रास्ट्रक्चर परवडणारे आहे व आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकणारे असल्याने वेळप्रसंगी गरज असल्यास खासगी व्यक्तींचे सहकार्य घेऊन सरकारने हे इन्फ्रास्ट्रक्चर उभारण्याचा कार्यक्रम तातडीने हाती घेतला पाहिजे. या दृष्टीने कृतीचे दोन मुख्य मुद्दे आहेत. त्यातला पहिला मुद्दा असा की, एवढ्या मोठ्या प्रमाणावर इन्फ्रास्ट्रक्चरचे काम हाती घ्यायचे म्हटले तर ५०० ते ६०० बिलीयन डॉलर्स गुंतवणूक करावी लागणार आहे. पण ही गुंतवणूक करण्यामध्ये कोणताही धोका नाही. ती यशस्वी होऊ शकेल याविषयी माझ्या मनात शंकाही नाही. तथापि यामध्ये मुख्यत्वे दोन अडथळे आहेत :-

१) पहिली अडचण अशी की, हे इन्फ्रास्ट्रक्चर उभे करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अनुभवी तज्ज्ञ व कुशल लोक मोठ्या संख्येने लागतील. आपण हे इन्फ्रास्ट्रक्चर उभे करू शकतो या विषयी माझ्या मनात शंका नाही, पण जसजसे काम वाढत जाईल तसतसे तेवढे उच्च शिक्षित, तांत्रिक, गुणवत्ता असलेले निष्णात अनुभवी लोक मिळणे कमी कमी होत जाते. या दृष्टीने लोक तयार करण्याकरिता चांगल्या गुणवत्तेचे शिक्षण देणाऱ्या संस्था उभ्या करण्याची आवश्यकता आहे. आज आपला भर निव्वळ भरमसाठ अभियांत्रिकी व तांत्रिक महाविद्यालये काढण्यात आहे. असल्या खोगीर भरतीचा काहीही उपयोग होणार नाही. आज आपल्या देशात जेवढे लोक उच्च शिक्षण घेतात त्याच्यापेक्षा पुढच्या पाच ते सहा वर्षांत असे शिक्षण घेणाऱ्यांची संख्या चौपट ते पाचपट झाली पाहिजे. पण हे शिक्षण गुणवत्तेचेच असले पाहिजे त्याबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड शासनाने व शिक्षण संस्थांनीही करता कामा नये. शिक्षण हा प्रत्येक राज्य सरकारच्या अखत्यारितला विषय आहे. त्या दृष्टीने त्यांनी वास्तवात उतरू शकतील अशी उद्दिष्टे ठरविली पाहिजेत. आमचा अनुभव असा आहे की, विकासाचा दर सात टक्क्यांवरून आठ टक्क्यांवर गेला की लगेचच चांगले अनुभवी कर्मचारी लोक मिळणे दुरापास्त होऊन जाते. २००७-०८ साली विकास दर नऊ टक्क्याला गेल्याबरोबर लगेचच माणसे कमी उपलब्ध व्हायला लागली. पगाराच्या त्यांच्या अपेक्षा भरमसाठ वाढल्या आणि नोकऱ्या सोडून जाण्याचे लोकांचे प्रमाणही वाढले. त्यामुळे उद्दिष्टांपर्यंत पोहोचणे अनेकदा अडचणींचे होऊ शकते.

२) दुसरी अडचण म्हणजे आपली कामकाजाची पद्धती (गव्हर्नन्स् सिस्टीम)-

आता केंद्र सरकारने या कामकाजाच्या पद्धतीत बराच बदल घडवून आणला आहे. नव्याने देखरेख करणाऱ्या यंत्रणा निर्माण केल्या आहेत. कामात सुसंगती यावी व जलद गतीने निर्णय घेतले जावेत म्हणून मंत्र्यांच्या पातळीवर समित्या स्थापन करण्यात येऊन कोण्या एका व्यक्तीवर निर्णयासाठी अवलंबून राहण्यापेक्षा सामूहिक पद्धतीने त्वरित निर्णय होऊ लागल्यामुळे अनिष्ट प्रथांना पायबंद बसवून कारभारात पारदर्शकता आलेली आहे. त्यामुळे केंद्र सरकारमधले गव्हर्नन्स् हे झपाट्याने बदलले आहे. त्याच पद्धतीने महाराष्ट्र राज्य सरकारचा कारभारही बदलला पाहिजे. त्याला गती, वेग व पारदर्शकता आली पाहिजे. तसे झाले तर उत्पादनवाढीचे उद्दिष्ट निश्चित साध्य करता येईल. खरे तर या सगळ्या विकास कामांमध्ये महाराष्ट्र हा कायम देशाच्याच पुढे असला पाहिजे, अशी अपेक्षा आपण ठेवली तर ते काय चुकीचे नाही. देशाचा जीडीपी दर ९ टक्के असला तर आपला तो किमान १० ते ११ टक्के असला पाहिजे. या दृष्टीने आपण काळजी घेऊन तसे नियोजन व आराखडे तयार केले पाहिजेत.

श्री. अशोक चव्हाण आणि श्री. छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली मंत्रीमंडळ नव्याने तयार झाले आहेत. त्यात अनेक चांगली मंत्री मंत्रीमंडळात आलेले आहेत. खातेवाटपही चांगल्या पद्धतीने झालेले आहे. विश्वास व अपेक्षा आहे की, हे सर्व मंत्री चांगले काम करतील आणि महाराष्ट्राच्या नावलौकिकात निश्चित भर घालून राज्य विकासात, देशात प्रथम क्रमांकावर नेतील.

■■■



# सेना-भाजप युतीला मतदारांची चपराक...

**- बंडा सासवडकर**

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत भाजप-शिवसेने युतीचा झालेला दारूण पराभव म्हणजे विरोधकांच्या नाकारात्मक, विध्वंसक राजकारणास महाराष्ट्रातील सुज्ञ मतदारांनी मारलेली जबरदस्त चपराकच आहे. या निवडणुका जाहीर झाल्या तेव्हा ''यावेळी राज्यात सत्तापरिवर्तन अटळ असून, आता आम्हीच सत्तेवर येणार, अशा गुर्मीत आक्रस्ताळी शिवसेनेप्रमाणे बोलभांड भाजपचीही सारी नेतेमंडळी होती. ''काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारच्या गेल्या दशकभराच्या निष्क्रिय, भ्रष्ट कारभाराला जनसामान्य विटले असून, आपला सारा असंतोष ते मतपेटीद्वारे व्यक्त करणार आहेत.'' असा 'जावईशोध' लावून या मंडळींनी विधानसभा भवनावर पुन्हा एकवार 'भगवा फडकविण्याची लगबग सुरू केली होती. त्यांची ही सारी अनाठायी लगबग आणि गुडघ्याला बाशिंग बांधून 'सत्तासुंदरी'चे मन जिंकण्याची धडपड म्हणजे अन्य काही नाही तर (अरोगन्स बेस्ड ऑन इग्नोरन्स) असाच अश्लाध्य प्रकार होता. त्यामुळे तो घडत असतांना फुकट मनोरंजन करून घेण्याखेरीज 'मतदाराराजा'च्या हाती फारसे काहीच नव्हते, परंतु प्रत्यक्ष मतदानाचा हक्क बजावण्याची वेळ आली तेव्हा मात्र त्याने आपले सारे बळ काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीच्या मागे निर्विवादपणे उभे केले आणि या सत्तातुरांच्या हाती धांदोटी दिली.



अन्य काही नाही तर निदान 'अँटी इनकम्बन्सी फॅक्टर' तरी सत्तारुढ आघाडी सरकारला भोवेलच, अशी भाजपचे प्रचारप्रमुख गोपीनाथ मुंडे व नितीन गडकरींसारख्या अनुभवी नेत्यांना खात्री होतीच, परंतु शिवसेनेचे कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे आणि भाऊबंदकींचा खेळ मांडून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची वेगळी चुल मांडणारे राज ठाकरे या बंधुद्वयांनी तर फार पुढची मजल गाठली होती. त्यापैकी उद्धवजी हे दै. 'सामना' च्या

**"नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीच्या पदरात निर्विवाद बहुमताचे दान टाकून महाराष्ट्राच्या जनतेने भाजप-शिवसेना युतीच्या नकारात्मक विध्वंसक राजकारणास जबरदस्त चपराक दिली आहे. आता जनतेने टाकलेल्या या विश्वासास प्रामाणिकपणे जागणे ही नव्या सरकारची जबाबदारी राहील. राज्याची सत्तासुत्रे मिळविण्याची स्वप्ने पाहातांना या दोन्ही पक्षांनी मतदारांसमोर राज्याच्या हिताचा, जनकल्याणाचा कोणताही ठोस, व्यवहार्य कार्यक्रम ठेवला नाही. त्यांचा सारा भर राहिला तो काही अनावश्यक धार्मिक-भावनिक आवाहने करून समाजात दुहीची व संघर्षाची बीजे पेरण्यावरच. त्यामुळे मग शांतता-स्वास्थ्य व प्रगतीची आस असलेल्या मतदारराजाने ते व त्यांचा नकारात्मक विध्वंसक कार्यक्रम या दोहोंना अगदी पूर्णपणे झिडकारले आहे."**





अतिरेकी भाषेत सांगायचे तर तथाकथित विराट, अतिविराट (?) सभांचे रान उठवून, 'आगामी मुख्यमंत्री शिवसेनेचाच', असे ठणकावून सांगत होते तर 'आगामी सरकार, मग ते कोणाचेही असो, आमच्या पाठबळावरच सत्तेवर येईल,' अशी शेखी राजसाहेब मिरवित होते. निवडणुकीचे निकाल शिवसेनेचा 'निकाल' लावणारे ठरल्यानंतर मात्र उद्धवजी इतके खचले की पुढे तीन-चार दिवस तरी त्यांना प्रसिद्धीमाध्यमांच्या प्रतिनिधींची तोंडे चुकवित लपून राहावे लागले आणि राजसाहेबांच्या पदरात तेरा जागा पडल्यामुळे शिवसेनेचे 'बारा' वाजले तरी काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीस निर्विवाद बहुमत मिळाल्याने त्यांचीही बोलती बंद झाली. अर्थात 'पडलो तरी नाक वर' अशा निरर्गल वृत्तीचे असल्यामुळे की काय, राजसाहेबांनी 'आपले तेरा आमदार सभागृहात आणि आपण स्वतः सभागृहाबाहेर जागल्याची भूमिका बजावून नव्या सरकारला महाराष्ट्राच्या हिताचे राजकारण करायला लावू' अशी नेहमीची दमदाटीवजा वक्तव्ये करून स्वतःची पाठ स्वतःच थोपटून घेतली आहे, परंतु त्यात काही अर्थ नाही, हे सारेचजण जाणून आहेत.

या निवडणुकीत भाजपचे विधानसभेतील संख्याबळ ५४ वरून ४६ वर आले तर शिवसेनेचे ६४ वरून ४४ वर ! राज्याची सत्तासुत्रे मिळविण्याची स्वप्ने पाहातांना या दोन्ही पक्षांनी मतदारांसमोर राज्याच्या हिताचा, जनकल्याणाचा कोणताही ठोस, व्यवहार्य कार्यक्रम ठेवला नाही. त्यांचा सारा भर राहिला तो काही अनावश्यक धार्मिक-भावनिक आवाहने करून समाजात दुहीची व संघर्षाची बीजे पेरण्यावरच. त्यामुळे मग शांतता-स्वास्थ्य व प्रगतीची आस असलेल्या मतदारराजाने ते व त्यांचा नकारात्मक विध्वंसक कार्यक्रम या दोहोंना अगदी पूर्णपणे झिडकारले आहे. खरे तर या सणसणीत चपराकीपासून योग्य तो बोध घेऊन युतीच्या नेत्यांनी आत्मपरीक्षणाची प्रक्रिया सुरू करणे गरजेचे होते. परंतु त्यांचा सारा जन्मच या-ना-त्या फुटकळ प्रश्नावर हिंसाचारी आंदोलनाचा वणवा पेटवून त्यावर स्वतःची पोळी भाजून घेण्यात गेला असल्याने कठोर आत्मपरिक्षणाऐवजी आता त्यांनी जनतेच्याच नावाने बोटे मोडायला सुरूवात केली आहे. काही दिवसांपूर्वी या दारूण पराभवाबद्दलचा संताप 'सामना' च्या अग्रलेखातून व्यक्त करतांना शिवसेनेप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी 'हा पराभव म्हणजे मराठी बांधवांनी केलेला आपला विश्वासघात आहे आणि त्यामुळे आता आपला देवावरचा विश्वासही उडाला आहे.'' अशी मखलाशी केली. त्यांचे हे उद्धट विचार मराठी माणसाबद्दलचे त्यांचे प्रेम किती बेगडी आहे, हेच स्पष्ट करणारे होते. अर्थात हे उशीरा लक्षात आल्यामुळे की काय, नंतर



बाळासाहेबांच्या चेल्यांनी ''सामनाचे अग्रलेख लिहिणे साहेबांनी कधीच थांबवले आहे.'' अशी सारवासारव करून त्या विषयावर पडदा टाकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला आहे, असो. एकूण जनमत आता आपल्या पाठीशी राहिलेले नाही, हे बाळासाहेबांनाही चांगलेच समजून चुकले आहे. त्यामुळेच की काय, मध्यंतरी 'शिवसेना भवना'त आपल्या पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांसमोर बोलतांना त्यांनी ''राज्यात सत्तेवर येण्याची संधी हुकली असली तरी मुंबई महापालिकेची सत्ता मात्र शिवसेनेच्या हाती राहील'' अशी डरकाळी फोडली. त्यांचा हा विश्वास म्हणजे खरे तर शिवसेनेची 'उतरणी भाजणी' सुरू झाल्याची अप्रत्यक्ष कबुलीच आहे. खुद्द शिवसेनाप्रमुखांसारखा 'ढाण्या वाघ' असा हताश झाला असतांना अंतर्गत यादवीत गुरफटलेले भाजपचे कढीचट नेते काही आवाज करतील आणि नव्या सरकारला धारेवर धरतील, अशी शक्यताच उरलेली नाही. कॉंग्रेस-राष्ट्रवादी आघाडीच्या दृष्टीने ही प्रमुख विरोधी पक्षांची दाणादाण म्हणजे 'आंधळा मागतो एक डोळा, पण देव देतो दोन.' अशीच काहीशी स्थिती आहे. पण निकोप लोकशाहीच्या एकूण भवितव्याच्या दृष्टीने हे चित्र अजिबात चांगले नाही, हे निश्चित. सरकार पक्षावर जनमताचा अंकुश राहाणे ही केवळ लोकशाहीची नाही तर काळाचीच गरज आहे. नव्या, बदलत्या परिस्थितीत ती पूर्ण होण्याची शक्यता नसल्यामुळेच की काय, दोन्ही कॉंग्रेस पक्षांनी मंत्रिमंडळ रचनेचे गुऱ्हाळ तब्बल पंधरवडाभर चालवून मतदारांच्या सहनशीलतेचा अंत पाहाण्याचे अनाठायी धाडस केले आहे. असो, झाले ते झाले. निदान आता तरी अंतर्गत सत्तास्पर्धेच्या खेळात अधिक काळविक्षेप न करतांना त्यांनी एकदिलाने कामास लागावे आणि राज्याच्या प्रगतीला नवी दिशा व वेग द्यावा, अशीच तमाम महाराष्ट्रवासीयांची अपेक्षा राहील. आजघडीस आपल्यापुढे महागाई, बेरोजगारी, गुन्हेगारी, भ्रष्टाचार आणि बिघडलेली कायदा-सुव्यवस्था स्थिती अशा अनेक गंभीर समस्या उभ्या आहेत. त्यांच्यावर मात करण्यासाठी विधानसभेत आवश्यक असलेल्या बहुमताचे माप मतदारराजाने कॉंग्रेस -राष्ट्रवादीच्या पदरात भरपूर टाकले आहे. आता त्याचे उतराई होणे आणि त्याने टाकलेल्या विश्वासास प्रामाणिकपणे जागणे, ही सत्तारूढ आघाडीची जबाबदारी राहील. ती योग्य प्रकारे पार पाडली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री अशोक चव्हाण व त्यांच्या सर्व नव्या-जुन्या सहकाऱ्यांनी आत्ता तरी दिली आहे. पाहु या काय होते ते... !

■■■



# महाराष्ट्र राज्य युवा धोरण

# युवा विकासाच्या ध्येयाकडे



- खा. सुप्रिया सुळे

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला २०१० साली पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने सुवर्ण महोत्सवी वर्षाची सुरुवातदेखील झालेली आहे आणि त्या अनुषंगाने राज्याच्या सांस्कृतिक धोरणाचीदेखील चर्चा एकीकडे सुरू झालेली आहे. मागील ५० वर्षांच्या काळात महाराष्ट्र राज्य शासनाने राज्याच्या उत्कर्ष व विकासासाठीची अनेक ध्येयधोरणे जाहीर केली आणि त्याची अंमलबजावणीदेखील मोठ्या प्रमाणावर करण्यात आली. त्यात प्रामुख्याने महिला धोरण, रोजगार धोरण, माहिती व तंत्रज्ञान धोरण, औद्योगिक धोरण, कामगार धोरण, कृषी धोरण, बालहक्क धोरण, शैक्षणिक धोरण अशा अनेक धोरणांचा समावेश करता येईल. महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. शरद पवार साहेबांनी नव्वदच्या दशकात जाहीर केलेले राज्याचे महिला धोरण हे देशातील पहिले महिला धोरण ठरले. या क्रांतिकारी धोरणाची अंमलबजावणी नंतर देशातील सर्वच राज्यांनी केली. महाराष्ट्रातील विविध धोरणांचा अभ्यास करता असे दिसून येते की, या सर्व बाबींमध्ये महाराष्ट्र राज्याने सर्वप्रथम विकासदायी योजनांची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतलेला आहे आणि त्याचा प्रत्यक्ष लाभ लाभधारकांपर्यंतही पोहोचविलेला आहे. मात्र, आतापर्यंतच्या या संपूर्ण प्रक्रियेला एक धोरण अपवाद ठरले. गेल्या ५० वर्षांच्या इतिहासात कुठल्याच राजकीय पक्षाद्वारे, युवक संघटनेतर्फे, विद्यार्थी संघटनेतर्फे, स्वयंसेवी संस्थांतर्फे त्याची मागणीदेखील करण्यात आलेली नाही. या सर्व बाबींचा अभ्यास करीत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियानाने अभियानाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाकडे विनंती केली ती राज्याचे युवा धोरण जाहीर करण्याची. केवळ मागणीच न करता राज्याच्या युवा धोरणाचा आदर्श मसुदा कसा असावा, या संदर्भातील आराखडादेखील राज्य शासनाला दि. ८ ऑगस्ट ०९ रोजी सादर करण्यात आला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई या संस्थेमध्ये गेल्या १३ वर्षांपासून नवमहाराष्ट्र युवा अभियान हा युवा विभाग कार्यान्वित आहे.

अभियानाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमार्फत मागील एक वर्षांपासून राज्याचे युवा धोरण जाहीर व्हावे, यासाठी प्रयत्न सुरु केले. यासाठी सर्वप्रथम राज्य शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण खात्यामार्फत माहिती मागविण्यात आली. त्यात असे आढळून आले की, राज्य शासनाने आतापर्यंत राज्याचे अधिकृत युवा धोरण जाहीर केलेले नाही; आणि मग सुरू झाला प्रवास, या संपूर्ण प्रक्रियेचा.

जागतिक युवा धोरण सर्वप्रथम १९८६ साली जाहीर करण्यात आले आणि ते वर्ष जागतिक युवा वर्ष म्हणून घोषित करण्यात आले. यावेळी संयुक्त राष्ट्रसंघातर्फे जगातील सर्व देशांनी आपापली युवा धोरणे जाहीर करावीत, अशा सूचना केल्या. या सूचनांना अनुसरून भारत सरकारच्या क्रीडा व युवा विकास खात्याने १९८८ साली देशाचे पहिले युवा धोरण जाहीर केले. हे युवा धोरण संपूर्णत: देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेसाठी युवक या संकल्पनेवर आधारित होते. त्यामध्ये युवा

“

**राज्य युवा धोरणाचा हा प्रस्तावित मसुदा महाराष्ट्रातील जनतेसमोर व युवांसमोर व्यापक चर्चेसाठी सादर करण्यात आलेला असून यावर चर्चा होऊन यात चर्चेनंतर काही बदल करून राष्ट्रीय युवा दिनी म्हणजेच दि. १२ जानेवारी २०१० रोजी हा अंतिम मसुदा राज्य शासनाकडे सादर करण्यात येईल. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये राज्य शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण खात्याने सहभागी होण्यासाठी सहमती दर्शविली असून असे झाल्यास दि. १२ जानेवारी २०१० रोजी महाराष्ट्र राज्याचे युवा धोरण जाहीर देखील होईल. आधुनिक व पुरोगामी राज्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्यात युवा विकासाबाबत ध्येय पूर्ण करण्यासाठीच्या एका नव्या पर्वाला सुरुवात होईल, हे नक्की.**

”




*उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत*
*मुंबईच्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये युवा धोरणावर चर्चा झाली.*

विकासाबाबतचा दृष्टिकोन स्पष्ट करण्यात आलेला नव्हता. या कारणास्तव २००३ साली केंद्रीय क्रीडा व युवा विकास मंत्रालयातर्फे देशाचे पुनरर्चित युवा धोरण जाहीर करण्यात आले. त्याचबरोबर केंद्र सरकारने सर्व राज्यांना आपापल्या राज्यांचे युवा धोरण जाहीर करण्याविषयी शिफारशी केल्या. त्याला अनुसरून गुजरात, आंध्र प्रदेश, कर्नाटक, हिमाचल प्रदेश, झारखंड यांसारख्या अनेक राज्यांनी आपापली युवा धोरणे जाहीर करून त्याची अंमलबजावणी क्रीडा व युवा विकास खात्यामार्फत सुरू केली. मात्र, महाराष्ट्रामध्ये या संदर्भातील चर्चादेखील सुरू झालेली नव्हती. या संपूर्ण प्रक्रियेचा अभ्यास यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे करण्यात आला. या अंतर्गत युवा धोरण मसुदा समिती व राज्यस्तरीय संयोजन समिती स्थापन करण्यात आली. मसुदा समितीच्या अध्यक्षस्थानी अभियानाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे या तर सदस्य म्हणून मा. प्रा. लता नारायण, मा. नीलेश पुराडकर, मा. मॅथ्यू मट्टम, डॉ. आर. आर. शिंदे, मा. महेंद्र रोकडे, मा. कौस्तुभ देवळे, मा. दत्ता बाळसराफ, मा. विश्वास ठाकूर, मा. विजय कान्हेकर, नीलेश राऊत हे आहेत. तर राज्यस्तरीय संयोजन समितीमध्ये नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे ७ विभागीय समन्वयक, १० विभागीय संघटक, ३६ जिल्हा संघटक, ३० शहर संघटक तसेच १०० स्वयंसेवक अशी मोठी फळी कार्य करीत आहे.

महाराष्ट्र राज्याचे युवा धोरण सर्व राज्यांपेक्षा अधिक प्रभावी व अंमलबजावणीच्या पातळीवर यशस्वी व्हावे, यासाठी या युवा धोरणाची रचना वेगळ्या पद्धतीने करण्याचे ठरले. महाराष्ट्रात प्रथमच असा प्रयोग करण्यात आला. एखादे धोरण ठरविताना किंवा त्याविषयी अभ्यास करताना प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत जाऊन धोरणात त्याच्या विकासासंदर्भातील कुठल्या बाबींचा समावेश व्हावा, हे विचारले गेले. त्या धोरणातील मुद्द्यांची माहिती व्यापक पातळीवर कार्यक्रम आखून त्यांना करून देण्यात आली. यासाठी नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे फेब्रुवारी ते ऑगस्ट ०९ या काळात महाराष्ट्रातील २० जिल्ह्यांमध्ये २० विभागीय युवा परिषदा, विभागीय कार्यशाळा, जिल्हा कार्यशाळा, तालुका कार्यशाळा घेण्यात आल्या. यामधून १३ ते ३५ वर्षे वयोगटातील विद्यार्थी, नोकरदार, अपंग, असंघटित कामगार, युवती, आदिवासी, मुस्लिम, दलित, तृतीयपंथी अशा समाजातील विविध स्तरातील ५,००० हून अधिक युवा सहभागी झाले. त्यांच्याकडून युवा धोरणातील बाबींची मांडणी करण्यात येऊन सर्व युवांकडून फीडबॅक फॉर्म भरून घेण्यात आले. त्याचा अभ्यास या धोरणाकरिता स्थापन करण्यात आलेल्या मसुदा समितीतर्फे करण्यात आला. या मसुदा समितीने जागतिक युवा धोरण, इतर देशांचे युवा धोरण, इतर राज्यांचे युवा धोरण,



***युवा धोरण जाहीर करण्यासाठी खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांची भेट घेऊन त्यांना एक लेखी निवेदन दिले.***

भारतीय लोकसंख्या विज्ञान संस्थेचे अहवाल, इतर संस्थांतर्फे प्रकाशित करण्यात आलेले अहवाल, क्रीडा व युवक कल्याण खात्याच्या योजना या सर्व बाबींचा अभ्यास करून या युवा धोरणाचा प्राथमिक मसुदा तयार केला. दि. १२ जून ०९ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे युवा धोरण माहिती परिषद घेण्यात आली. या परिषदेत अभियानाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे यांनी राज्य शासनाने युवा धोरण जाहीर करावे, अशी विनंती राज्य शासनाकडे करावी. त्याच दिवशी विधानभवनात नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या शिष्टमंडळासह मुख्यमंत्री मा. अशोकराव चव्हाण व उपमुख्यमंत्री मा. छगनराव भुजबळ यांची भेट घेऊन राज्य शासनाने युवा धोरण जाहीर करावे, याबाबतचे निवेदन त्यांना सादर करण्यात आले. यानंतर दि. ८ ऑगस्ट ०९ रोजी महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीरनामा उपक्रमांतर्गत राज्याच्या युवा धोरणाचा प्राथमिक मसुदा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे महाराष्ट्रातील शेकडो युवक-युवतींच्या उपस्थितीत एका शानदार कार्यक्रमात उपमुख्यमंत्री मा. छगनराव भुजबळ, क्रीडा व युवक कल्याण खात्याचे मंत्री मा. डॉ. सतीश पाटील, मा. हुसेन दलवाई, प्रतिष्ठानचे सरचिटणीस मा. शरद काळे यांच्या उपस्थितीत सादर करण्यात आला. दि. ९ ऑगस्ट ०९ रोजी वर्षा बंगल्यावर निमंत्रक मा. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. अशोकराव चव्हाण यांनादेखील हा मसुदा सादर केला.

राज्य युवा धोरणाचा हा प्रस्तावित मसुदा महाराष्ट्रातील जनतेसमोर व युवांसमोर व्यापक चर्चेसाठी सादर करण्यात आलेला असून यावर चर्चा होऊन यात चर्चेनंतर काही बदल करून राष्ट्रीय युवा दिनी म्हणजेच दि. १२ जानेवारी २०१० रोजी हा अंतिम मसुदा राज्य शासनाकडे सादर करण्यात येईल. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये राज्य शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण खात्याने सहभागी होण्यासाठी सहमती दर्शविली असून असे झाल्यास दि. १२ जानेवारी २०१० रोजी महाराष्ट्र राज्याचे युवा धोरण जाहीरदेखील होईल.

आधुनिक व पुरोगामी राज्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्यात युवा विकासाबाबत ध्येय पूर्ण करण्यासाठीच्या एका नव्या पर्वाला सुरुवात होईल, हे नक्की.

# युवा धोरणातील महत्त्वाच्या काही बाबी

- क्रीडा व युवक कल्याण खात्याच्या नावाऐवजी क्रीडा व युवा विकास खाते असे संबोधावे. जेणेकरून व्यापक पातळीवर युवक-युवतींचा सहभाग यामध्ये अधोरेखित होईल.
- केंद्र शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण खात्याच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य शासनाने क्रीडा व युवक कल्याण खात्यामध्ये क्रीडा विभागासाठी व युवक कल्याण खात्याकरिता दोन सचिव दर्जाचे वेगवेगळे अधिकारी नियुक्त करावेत. जेणेकरून दोन्ही खात्यांच्या विविध उपक्रमांना योग्य पातळीवर न्याय देता येईल.
- महाराष्ट्र राज्य शासनाने राज्य युवा आयोग निर्माण करावा. जेणेकरून शासनातील विविध खात्यांमधून युवांविषयी असलेल्या योजनांकरिता युवक-युवतींना त्यांचे प्रश्न, समस्या, सूचना मांडण्यात मदत होईल.
- महाराष्ट्र राज्य शासनाने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या धर्तीवर युवा विकासासंदर्भातील कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात जिल्हा युवा विकास अधिकारी कार्यालयाची निर्मिती करावी. त्या ठिकाणी जिल्हा युवा अधिकारी व त्या संदर्भात स्वतंत्र यंत्रणा उभी करावी.
- महाराष्ट्र राज्य शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण खात्यातर्फे या पूर्वी सुरू असलेली युवा विकासासंदर्भात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवांना दिला जाणारा 'राज्य युवा पुरस्कार' पुनश्च सुरू करावा. विभागीय युवा पुरस्कार (प्रत्येक विभागातून एक युवक व युवती) व अंतिम राज्यस्तरीय युवा पुरस्कार (एक युवक व युवती) अशी या योजनेची रचना असावी.
- महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीर झाल्यानंतर त्यातील योजनांची व महत्त्वपूर्ण बाबींची माहिती राज्यातील सर्व युवक-युवतींना मिळावी आणि त्या योजनांचा त्यांनी लाभ घ्यावा, याकरिता राज्य पातळीवर जनजागृती मोहीम हाती घेण्यात यावी. युवा धोरणाप्रती जिल्हा पातळीवर शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, युवा संघटना, पक्षीय युवा संघटना यांच्यापर्यंत मुबलक प्रमाणात पोहोचविण्यात याव्यात.
- महाराष्ट्र राज्य शासनाने विधानसभेमध्ये युवा विकासासंदर्भात विविध खात्यांमधील विविध योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीकरिता माननीय आमदारांची अंतर्गत समन्वय समिती स्थापन करावी.
- महाराष्ट्र राज्य शासनाच्या विविध खात्यांमार्फत युवांना रोजगार व स्वयंरोजगार योजनेच्या आतापर्यंतच्या कार्याचा एकत्रितपणे आढावा घेऊन योजनांची व्याप्ती वाढवावी.
- महाराष्ट्र राज्य शासनाने युवक कल्याण खात्यामार्फत एक अभ्यास समिती स्थापन करून शासनाच्या विविध खात्यांमार्फत तसेच इतर राज्यांतील शासनामार्फत रोजगार व स्वयंरोजगाराकरिता तयार केलेल्या विविध योजनांचा अभ्यास करून त्यातील महत्त्वाचे मुद्दे लक्षात घेऊन त्या संदर्भात रोजगार व स्वयंरोजगार खात्यासोबत काही नवीन योजनांची अंमलबजावणी करावी.
- युवक कल्याण खात्याशी संलग्नित विविध युवक मंडळामध्ये युवतींची संख्या ही युवकांशी समान असावी. या युवा मंडळांना युवक कल्याण खात्याशी संलग्न करताना व त्यांची नोंदणी करताना या युवा मंडळामध्ये कमीतकमी ३०% युवतींचे सदस्यत्व बंधनकारक असावे.
- केंद्र शासनाचा युवक कल्याण विभाग, नेहरू युवा केंद्र, विविध स्वयंसेवी संस्थांतर्फे युवा विकासात्मक राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांमध्ये राज्य शासनाच्या युवक कल्याण विभागाने सहभागी व्हावे. त्याचबरोबर राज्य सरकारच्या युवक कल्याण खात्याने इतर शासकीय युवा खात्यांपेक्षा वेगळ्या युवा विकासात्मक योजना जाहीर कराव्यात. या निमित्ताने शासनाच्या विविध खात्यांमध्ये युवाविषयक योजनांकरिता होणारी फलदायी स्पर्धा ही महाराष्ट्रातील युवांकरिता नक्कीच उपयुक्त राहील.
- महाराष्ट्र शासनाच्या युवक कल्याण खात्याचे मा. मंत्री (क्रीडा व युवक कल्याण खाते) यांच्या अध्यक्षतेखाली युवक कल्याण खाते- महाराष्ट्र राज्य, नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना, एन.सी.सी., स्काउट-गाईड, युवा विकासविषयक कार्य करणाऱ्या संस्था व संघटनांच्या प्रतिनिधींना सहभागी करून सर्व युवाविषयक योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता राज्यस्तरीय समन्वय समिती स्थापन करावी.
- तालुकास्तरीय युवा विकास सल्लागार समिती बनविण्यात यावी. या समितीमध्ये विविध सामाजिक घटक, गैरसरकारी संस्था, युवा मंडळे यांतील युवांचा समावेश असावा.



- शासनाच्या आरोग्य विभागाबरोबरच आरोग्य क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या सामाजिक संस्थांनी, युवांमध्ये एड्स जाणीव जागृतीबरोबरच इतर घातक संसर्गजन्य रोगांसंदर्भात जाणीवजागृतीबाबत आग्रही भूमिका धरावी.
- युवांमध्ये व्यसनांच्या दुष्परिणामांबाबत जाणीवजागृती करून व्यसने टाळण्यासाठी उद्युक्त करावे. यासाठी राष्ट्रीय सेवा योजना, एन.सी.सी. व युवा मंडळे यामधील युवांमार्फत व्यसनमुक्ती केंद्र स्थापन करून चालवावीत.
- भारत सरकारच्या योजनेप्रमाणे राज्य युवा केंद्र व जिल्हा युवा केंद्र स्थापन करण्यास पुढाकार घ्यावा. ही युवा केंद्रे शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार व इतर युवा कार्यक्रमांसाठी एक खिडकी योजनेंतर्गत महत्त्वाची ठरतील.
- या अंतर्गतच राज्यस्तरीय निवासी युवा प्रशिक्षण केंद्र एका वर्षात स्थापन करण्यात यावे. यामध्ये राज्यातील विविध भागांतील युवा प्रतिनिधींसाठी या धोरणामध्ये नमूद केलेल्या मूल्यांवर आधारित प्रशिक्षण दिले जाईल.
- समाजामध्ये युवांच्या अधिकार व युवांसंबंधीचे मुद्दे संदर्भात जाणीवजागृती कार्यक्रम हाती घेण्यात यावा.
- राज्य युवा समितीतर्फे युवांच्या सद्यःस्थितीवर दरवर्षी युवास्थिती अहवाल प्रकाशित करण्यात यावा.
- गाव व तालुकास्तरीय युवा मंडळांकरिता राज्यस्तरीय समन्वय समितीतर्फे एक विस्तृत मार्गदर्शिका तयार करण्यात यावी. या मार्गदर्शिकेत या समितीचा वर्षभराचा कृती आराखडा त्यांच्या उद्दिष्टांसकट देण्यात यावा.

■■■

*ज्येष्ठ अभिनेत्री सुमती गुप्ते ३१ ऑक्टोबर, २००९ या दिवशी गेल्या आणि महाराष्ट्राच्या रजतपटावरच्या सुकन्यांच्या परंपरेतील एक गुणी लेक कायमची काळाच्या पडद्याआड गेली. ७ नोव्हेंबर, २००९ ला सुनीताबाई देशपांडे गेल्या. महाराष्ट्राचं लाडकं दैवत पु. ल. देशपांडे यांच्या सहधर्मचारिणीच नव्हे तर एक स्वयंप्रज्ञ, स्वयंभू व्यक्तिमत्त्व हरपलं. या दोघींच्या स्मृतीस अभिवादन आणि शब्दरूप श्रद्धांजली.*





# जाहला सूर्यास्त राणी

- सुलभा तेरणीकर

सुनीता देशपांडे गेल्या. ७ नोव्हेंबर २००९. पु. लं. च्या नव्वदाव्या जयंतीच्या आदल्या दिवशीच प्रस्थान ठेवलं. जरा व्याधींचं ओझं फेकून देऊन 'सुंदर मी होणार' असं दिदीराजेंसारखं म्हणत गेल्या.

पुलंच्या लेखनातून, जीवनातून, सहप्रवासातून साक्षीभावाने हजर असणाऱ्या, एखाद्या अदृश्य शक्ती सारख्या पुलंच्या साहित्य विश्वात, जीवनात संचार करणाऱ्या सुनीताबाईंनी आपला निरोप घेतला आणि एक वादळ शांत झालं.

महाराष्ट्राचं लाडकं दैवत पुलंच्या त्या जणू संरक्षण देवता होत्या. गोष्टीवेल्हाळ, संगीताची, गप्पांची मैफल जमवणाऱ्या, कलंदर पुलंना गर्दीतून सोडवून लिखाणासाठी, एकटं, मोकळं राहण्यासाठी त्यांनी जवळच्या लोकांचे, पुलंच्या चाहत्यांचे अप्रियतेचे बाण कितीदा झेलले असतील. प्रतिभावंत, एखाद्या लहान मुलासारख्या वृत्तीच्या पुलंसारख्या व्यक्तीचा सांभाळ हे त्यांचे जणू मिशन होते. सारी प्रापंचिक, व्यावहारिक व्यवधानं त्यांनी स्वतःवर ओढवून घेतली. स्वतःएक स्वयंभू व्यक्तिमत्व असलेल्या सुनीताबाई खरं तर त्या एका स्वतंत्र साम्राज्याच्या राणी होत्या. पण पुलंची पत्नी म्हणून राहणं. तशीच ओळख असणं त्यांनी स्वीकारलं. त्यांची गृहिणी, सखी, सचिव झाल्या आणि म्हणूनच पु.ल. आपल्याला लाभले. आपल्या लाडक्या दैवतात त्यांचे अस्तित्व जणू एकरूप झाले असले तरी त्यांच्या व्यक्तिमत्वाचा वेधही स्वतंत्रपणे घेता येतो.



पुलचं साहित्य, संगीत, नाटक, चित्रपट इ. क्षेत्रातील कर्तृत्व अफाट आहेच. पण समाजसेवेसाठी उदारहस्ते दिलेलं दातृत्व हा देखील मोठा कौतुकाचा, आश्चर्याचा विषय आहे. अक्षरावर, साहित्यावर मराठी साहित्यिकाचं निर्वाह करणं, जगणं ही मुळात कठीण गोष्ट. तिथं पुलंनी जे भरभरून मिळवलं तेच मुक्तपणे समाजाला दिलं. अत्यंत साधी राहणी स्वीकारली. यात सुनीताबीईंनी मदतकार्याचा गोवर्धन पेलला. ह्या स्वतंत्रपणाचं, समाजकार्याचं देणं सुनीताबाईंना आईवडिलांच्या संस्कारातून मिळालं. रत्नागिरीचे सदानंद ठाकूर वकील म्हणजे एक विद्यासंपन्न आणि समाज कार्याला वाहून घेतलेलं ऋषितुल्य व्यक्तिमत्व होतं. त्यांची सुनीता ठाकूर ही बाणेदार लेक समाजकार्याला समर्पित अशी तेजस्वी युवती होती. वैचारिक अधिष्ठान असलेली स्वयंप्रकाशी ताऱ्यासारखी होती.

१९४२ च्या स्वातंत्र्यलढ्याच्या

**'पुल देशपांडे फौंडेशन' आणि त्यातून सामाजिक कार्यासाठी झालेली भरघोस मदत, योग्य, सत्पात्री मदत हे खास सुनीताबाईंचे काम ! पुलंच्या कर्तृत्वाने आलेली धनसंपदा पुल आणि सुनीताबीईंनी डोळसपणे दातृत्वाने समाजाला परत दिली. सामाजिक अडचणी, गरजा शोधून सुयोग्य माणसांकडे सोपवण्याचं कार्य सुनीताबाईंचे! व्यसनमुक्तीसाठी कार्य करण्यासाठी खुले केलेले 'मुक्तांगण' ही सुनीताबीईंची मोठी देणगी! ९० सालानंतर सुनीताबाईंनी लेखणी उचलली. 'आहे मनोहर तरी' या आत्मकथनामुळे त्यांच्या अंतर्यामी उठणाऱ्या वादळाची वाचकांनी कल्पना आली. 'सकळ सोयरे', 'प्रिय जी.ए.' यातून त्यांच्या मनाचे आकाश थोडे न्याहाळता आले. आकाशाच्या वर आणि समुद्राच्या खोलवर असणाऱ्या शांतीचा त्या शोध घेत होत्या. कदाचित तिथे वादळंही असतील तर त्यांना सामोरं जायचं ह्या तयारीत होत्या.**



रोमहर्षक पर्वात पुलं सारख्या बहुरंगी व्यक्तिमत्वाचा तरूण लेखक, वक्ता, अभिनेता, संगीतकार, हजरजबाबी, गुणी त्यांच्या आयुष्यात आला. राष्ट्रसेवा दलातल्या परिचयातून ते एकत्र आले. आणि दोन अद्वितीय व्यक्तींचा विलक्षण सहप्रवास सुरू झाला. कला, साहित्याच्या बेभरवशाच्या वाटांवर चालण्याचा हा निर्णय होता. दोघांनी जणू आपली नौका वादळाकडे नेण्याचे साहस केले.

बेळगावच्या राणी पार्वतीदेवी कॉलेजातली प्राध्यापकाची नोकरी, रेडिओतली नोकरी हा अपवाद सोडला तर पुलंचा चित्रपट, नाटक, लेखन असा निसरड्या वाटेवर प्रवास सुरू झाला त्यात सुनीताबाईंनी आपल्या खांद्यावर रथचक्र पेलले.

१९४८ साली पुल-सुनीताबाईंनी 'वंदे मातरम्' या चित्रपटात काम करून एक साहसी पाऊल पुढे टाकलं तेव्हा कौटुंबिक, सामाजिक वर्तुळात आश्‍चर्य, कुतूहल, कौतुक आणि काहीसा विरोधाचा सूर उमटला होता. पुलंची लेखणी चित्रपटलेखनासाठी दमदारपणे चालली. 'गुळाचा गणपती', 'पुढचं पाऊल', 'अंमलदार' असे चित्रपट तर 'तुझे आहे तुज पाशी', 'सुंदर मी होणार' अशी नाटकं, 'म्हैस' चे अभिवाचन 'हसवण्याचा माझा धंदा' अशा कार्यक्रमाचे प्रयोग, 'अपूर्वाई', 'बटाट्याची चाळ', 'पूर्वरंग' अशी चढती कमान होती. पुल लेखनातून, कार्यक्रमातून वाचकांना, श्रोत्यांना मनमुराद हसवत होते, कधी अंतर्मुख करीत होते. सामान्य माणसांना, जाणकारांना, विद्वान, राजकारण्यांना पुल मनसोक्त हसवीत होते. मराठी माणूस बऱ्याच काळानंतर खदखदून हसत होता. रविवारच्या सकाळी पेटी ओढून गाणं बजावणं करणाऱ्या पुलंच्या 'वाऱ्यावरची वरात' मधल्या मध्यमवर्गीय माणसाची पत्नी म्हणून सुनीताबाई मात्र पुलंचं कलावैभव, लोकप्रियता, माणसांची प्रचंड गर्दी, कामाचं वेळापत्रक, खर्चाचं-जमेचं अंजादपत्रक, पुलंचं स्वास्थ्य, नातेसंबंध, पक्षव्यवहार, भेटीगाठी असा प्रचंड व्याप सांभाळण्यात मग्न होत्या.

'बटाट्याची चाळ', 'असा मी असा मी', 'वाऱ्यावरची वरात', चे तडाखेबंद प्रयोग सुरू असताना बॅकस्टेज व्यवस्था डोळ्यात तेल घालून पहाणं सुनीताबाईंचंच काम. स्टेजवर बारीकसा खिळाही राहू नये, तिकिटविक्री नीट पार पडावी, फ्री पासेस कुणीही मागू नयेत ही चौफेर दक्षता सुनीताबाईंचीच !

'वाऱ्यावरची वरात' मधल्या ठसकेबाज कानडी-मराठी बोलणाऱ्या कडवेकर मामी त्या उभी करत. परदेश दौऱ्यांची आखणी, पुलंच्या कार्यक्रमांच्या तारखांचे पंचाग अधोरेखित करीत असत. स्वतः गाडी चालवून पुलंच्या ड्रायव्हरही प्रसंगी होत, आणि पाहुण्यांच्या सरबराईसाठी डोळ्यांना पाणी आणणारा





कांदाही चिरत असत. आणि भाईंच्या (पुलंना त्या भाई म्हणत) विनोदाला डोळ्याला पाणी येईपर्यंत हसत असत. भाईंचे विनोद किती टिपून ठेवू असं म्हणत असत.

सुनीताबाई-पुल जगभर हिंडले. भारतातल्या विद्वानांना, कलावंतांना, सामान्य चाहत्यांना भेटले. पुलंचा अफाट जनसंपर्क, आणि पत्रव्यवहार हे स्वतंत्र प्रकरण ठरावं. या प्रचंड पत्रव्यवहाराचा हिशोब सुनीताबाईंनी अत्यंत दक्षपणे सांभाळला. पुलंचा रसिक, चाहत्यांचा परिवारही जपला.

'पुल देशपांडे फौंडेशन' आणि त्यातून सामाजिक कार्यासाठी झालेली भरघोस मदत, योग्य, सत्पात्री मदत हे खास सुनीताबाईंचे काम !

पुलंच्या कर्तृत्वाने आलेली धनसंपदा पुल आणि सुनीताबीईंनी डोळसपणे दातृत्वाने समाजाला परत दिली. सामाजिक अडचणी, गरजा शोधून सुयोग्य माणसांकडे सोपवण्याचं कार्य सुनीताबाईंचे! व्यसनमुक्तीसाठी कार्य करण्यासाठी खुले केलेले 'मुक्तांगण' ही सुनीताबीईंची मोठी देणगी!

९० सालानंतर सुनीताबाईंनी लेखणी उचलली. 'आहे मनोहर तरी' या आत्मकथनामुळे त्यांच्या अंतर्यामी उठणाऱ्या वादळाची वाचकांनी कल्पना आली. 'सकळ सोयरे', 'प्रिय जी.ए.' यातून त्यांच्या मनाचे आकाश थोडे न्याहाळता आले.

आकाशाच्या वर आणि समुद्राच्या खोलवर असणाऱ्या शांतीचा त्या शोध घेत होत्या. कदाचित तिथे वादळंही असतील तर त्यांना सामोरं जायचं ह्या तयारीत होत्या.

कविता हा त्यांना जवळचा आधार होता. पुल, सुनीताबाई मर्ढेकर, बोरकर, खानोलकर यांच्या कवितांचे अभिवाचन करीत असत. हा प्रत्यक्ष अनुभव ज्यांनी घेतलेला असेल त्यांना ठाऊक आहे की सुनीताबाई यात पुलंच्या पुढे एक पाऊल जात असत. नाट्यमयता, अभिनिवेश बाजूला सारून कवितेच्या अंतरंगाशी एकरूप होऊन तीव्रकोमल स्वरांची आंदोलनं श्रोत्यांपर्यंत येत असत. मर्ढेकरांच्या कवितेतला उपरोध, बोरकरांची रसमयता आणि खानोलकरांच्या कवितेतलं दुःख यांचे रसायन.

श्रोत्यांच्या अंतर्मनात जाऊन भिनत असे ते सुनीताबीईंच्या उत्कट वाचनाने !

'जाहला सूर्यास्त राणी खोल पाणी जातसे'

या ओळी सरसा येणारा तिन्ही सांजेचा हळवा क्षण सुनीताबीईंबरोबर श्रोतेही अनुभवत.

आज त्या क्षणाच्या अथांगतेत सुनीताबाई पोहचल्या असतील. कदाचित तिथे निःशब्द शांती असेल, कदाचित फार मोठे वादळही ! कवितेचा आधार घेऊन दोन्हींना त्या समर्थपणे सामोरं जातील.

जीवनातील मनोहर दृश्यांना, उदासपणाला त्यांनी स्वीकारलं. महाराष्ट्राला आज त्यांच्या लाडक्या दैवताला सांभाळणाऱ्या या अनाम शक्तिदेवतेची आठवण होत आहे.

सुनीताबाईंच्या स्वतंत्र साम्राज्याला अभिवादन !

■■■





# मराठी रजतपटावरची राजसबाळी...

चित्रपट मौन होता तेव्हा, अन् बोलू लागला तेव्हापासून मराठी मुलींनी रजतपटावर आपली पावलं टाकली. कमलाबाई गोखले, दुर्गा खोटे, ललिता पवार, स्नेहप्रभा प्रधान, लीला चिटणीस, मीनाक्षी, शोभना समर्थ, हंसा वाडकर, शांता आपटे, रत्नमाला, वनमाला, सुलोचना अशी किती तरी नावं आठवतात. ह्याचं प्रत्येकीचं एक वेगळं साम्राज्य, वेगळं सामर्थ्य. सौंदर्यवती, नृत्यकुशल, अभिनय संपन्न, गोडगळ्याच्या मराठी मुलींनी पडद्यावर आणि रसिक ह्दयात आपल्या पाऊलखुणा उमटवल्या. अधिराज्य केलं. या तुलनेत खरं तर सुमती गुप्ते हे नाव पानाआड दडलेल्या हिरव्या चाफ्यासारखं. स्निग्ध पणतीच्या उजेडासारखं, मत्त सुंगधासारखं. दुर्मीळ, काहीसं प्रसिद्धीपासून दूर राहिलेलं. गॉसिप, विशिष्ट इमेज, गर्दी-प्रसिद्धीपासून खूप दूर राहिलेलं सुमती गुप्ते हे नाव अनामिक सौम्य प्रकाशानं वलयांकित होतं.

सत्तर वर्षांपूर्वी महाविद्यालयाची पायरी चढणाऱ्या ज्या भाग्यवान मुली होत्या त्यापैकी एक सुमती गुप्ते. सुसंस्कृत, पुरोगामी आणि संपन्न घराच्या पार्श्वभूमीवर विपुल केशसंभार असलेल्या, गौरवर्णी, मोहक चेहऱ्याच्या युवतीला त्यावेळी रुपेरी पडद्यानं खुणावलं. तिनं आपलं छायाचित्र अन् चित्रपटात काम करण्याची इच्छा असलेलं छोटसं ह्दगत व्ही. शांताराम यांना लिहिलं. अर्थात घरची परवानगी घेऊनच. पण शांतारामबापूंकडे काम करायचा योग नव्हता. दामले-फत्तेलाल संत ज्ञानेश्वर हा चित्रपट करीत होते. १९४० सालच्या 'संत ज्ञानेश्वर' मध्ये नर्मदेच्या छोट्याशा भूमिकेत तिला कामही मिळालं. सुमती गुप्ते या नावानं रुपेरी पडद्यावर आपला ठसा उमटवला. ज्ञानेश्वर निघून गेल्यावर त्यांच्या पावलांच्या खुणा उमटतात त्यावर मूकपणे फुलं अर्पण करणाऱ्या नर्मदेच्या भूमिकेतल्या सुमतीबाईंनी त्या प्रसंगात गहिरे रंग भरले.

त्यानंतर भालजी पेंढारकर यांच्या 'थोरातांची कमळा' मधील मुख्य कमळेची भूमिका त्यांना करायची संधी मिळाली. भालजींच्या 'सूनबाई'मधील त्या सुंदर, सोज्ज्वळ सूनबाई झाल्या. 'सूनबाई' चा उत्तरार्ध होता 'सासुरवास'. त्यामध्ये आणखी एक सोज्ज्वळ चेहरा मराठी चित्रसृष्टीला लाभला. - सुलोचनाबाईंचा. 'प्रपुल्ल'च्या 'गजाभाऊ'मध्ये त्या नायिका झाल्या. चाळीसच्या दशकातल्या पहिल्या चरणाचा हा कालखंड होता. 'चिमुकला संसार' ह्या मा. विनायकांच्या चित्रपटाच्या सेटवर एक देखणा, हरहुन्नरी युवक दिग्दर्शनाच्या कामात मदत करीत होता वसंत जोगळेकर नावाचा. सुमती बाई व वसंत जोगळेकर लवकर विवाहबद्ध झाले. चित्रनिर्मितीच्या आणि वैवाहिक जीवनाच्या संसाराची ही सुरूवात झाली... हिंदी-मराठीतील चित्रनिर्मिती, नाटक. चित्रपटातून कामं करणं आणि घरची आघाडी सांभाळणं हे समर्थपणे सुमतीबाईंनी वसंतरावांना साथ देऊन केलं.



वसंतराव जोगळेकरांच्या पंचदीप पिक्चर्स, मधु मूव्हीज, 'मीरा चित्र' या संस्थातून अनेक चित्रपट निर्माण झाले. सुमतीबाईंची त्यांना साथ लाभली. पु. लं. च्या 'सुंदर मी होणार' व आधारित 'आज और कल', 'आँचल', 'कारागिर', 'जानकी', 'हा खेळ सावल्यांचा', 'एक कली मुस्काई' असे हिंदी-मराठी चित्रपट जोगळेकर पतिपत्नींनी निर्माण केले.

काही चित्रपटातून त्या दिसल्या. 'जय मल्हार', 'साखरपुडा', 'नंदकिशोर', 'भाई साहेब', 'शेवग्याच्या शेंगा', 'शेवटचा मालुसरा', 'देव जागा आहे', 'क्षण आला भाग्याचा', 'कचिक वध', 'दाम करी काम' असे काही चित्रपट सिनेरसिकांना आठवतील.

पण १९५१ सालचा 'ऊनपाऊस' केवळ अविस्मरणीय ठरला. ऐन तारुण्यात त्यांनी एका वृद्ध स्त्रीची भूमिका केली. राजा परांजपे त्यांचे सहनायक होते. त्यात त्यांनी भरलेले गहिरे रंग आजही पुसले नाहीत.

मराठी रंगभूमीवर 'लग्नाची बेडी', 'उद्याचा संसार', 'संशय कल्लोळ', 'घराबाहेर' मधील त्यांच्या भूमिका गेल्या पिढीच्या नाट्यप्रेमींना आजही आठवत असतील.

सुविद्य, सुसंस्कृत आणि सुंदर व्यक्तिमत्वाच्या सुमतीबाई गुप्ते मराठी आभिनेत्रींच्या अभिमानी मालिकेतल्या एक अनमोल दुवा होत्या. आज तो निखळला आहे.

**- सुलभा तेरणीकर**

■■■




# क्रीडाविश्वावर राज्य क्रिकेटचे क्रिकेटवर राज्य ऑस्ट्रेलियाचे!

– मुकुन्द मोघे

आंतरराष्ट्रीय क्रीडाक्षेत्रास सध्या भारले आहे ते मुख्यतः 'क्रिकेट-फीवर' ने ! गेल्या महिन्याच्या पूर्वार्धात दक्षिण आफ्रिकेच्या भूमीवर खेळली गेलेली 'चॅम्पियन करंडक'' स्पर्धा, त्यानंतर लगेचच भारतात झालेली आयपीएलची ट्वेंटी ट्वेंटी चॅम्पियन लीग आणि आता सात एक दिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी जगज्जेत्या ऑस्ट्रेलिया संघाचे आपल्या देशात झालेले आगमन यामुळे या 'क्रिकेट फीवर' ची तीव्रता वाढतच चालली असून, नजिकच्या काळात तरी ती कमी होण्याची अजिबात शक्यता दिसत नाही, कारण आता आगामी काही दिवसांत कसोटी मालिका खेळण्यासाठी श्रीलंकेचा संघ भारत दौऱ्यावर येणार आहे तर पाकिस्तान-न्युझीलंड दरम्यानची 'वन-डे' सामन्यांची मालिका संयुक्त अरब अमिरातीत रंगणार आहे. क्रिकेटचा हा 'अतिरेकी डोस' खेळाडूंप्रमाणे प्रेक्षकांच्या दृष्टीनेही फारसा सुखद नाही परंतु या श्रीमंती खेळाचे सुत्रचालन करणाऱ्या संघटक-आयोजकांचे उखळ मात्र त्यामुळे चांगलेच पांढरे होत असल्यामुळे सध्या तरी काही बदल होणे तसे कठीणच दिसते. असो.

दक्षिण आफ्रिकेत 'चॅम्पियन करंडक'' साठी झालेली एकदिवसीय सामन्यांची लढत ही 'विश्वकरंडक स्पर्धा' होती आणि त्यातील संभाव्य विजेते म्हणून यजमान दक्षिण आफ्रिका, भारत व श्रीलंका या तीन संघांकडे पाहिले जात होते, परंतु स्पर्धेच्या सलामतीच्या लढतीतच श्रीलंकेने दक्षिण आफ्रिकेवर सहजी मात केली आणि मग त्या धक्क्यातुन दक्षिण आफ्रिकेचे खेळाडू शेवटपर्यंत सावरले नाहीत. खरे तर, कर्णधार स्मिथ, कॅलिस, गब्ज व ड्युमिनी, डिव्हीलर्स सारखे जबरदस्त फलंदाज आणि स्टेन, पार्नेर, बोथा सारखे हुकुमी गोलंदाज संघात असतांना दक्षिण आफ्रिकेचा संघ आंतरराष्ट्रीय महत्वाच्या स्पर्धांमध्ये दरवेळी कसा काय अपयशी ठरतो, हे कोडेच आहे. या स्पर्धेतील दारूण अपयशामुळे ते कोडे आता अधिकच गडद झाले असून दक्षिण आफ्रिकेचा संघ 'चोकरच असल्यामुळे पुन्हा एकवार सिद्ध झाले आहे.

त्या संघाप्रमाणे भारतीय संघाचीही कामगिरी या स्पर्धेत अतिशय निराशाजनक झाली. पारंपारिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्धच्या सामना गमावल्यानंतर कर्णधार धोनी व त्याच्या जिगरबाज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सर्वच जुन्या-नव्या सहकाऱ्यांची अवस्था अगदी केविलवाणी झाली होती. आजवर झालेल्या सर्व विश्वकरंडक स्पर्धांत भारताने पाकिस्तानला हरविले आहे, परंतु यावेळी मात्र त्या रेकॉर्डला तडा गेला. पाकच्या दृष्टीने सर्वदृष्ट्या संस्मरणीय म्हणाव्या अशा या विजयाचा मानकरी ठरला तो अष्टपैलू शोएब मलिक. अनुभवी महंमद युसुफच्या साथीत विक्रमी द्विशतकी भागी नोंदवित असतांना मलिकने वैयक्तिक सुरेख शतकही झळकावले, या

**"भारताच्या दोन्ही विजयांत कर्णधार धोनीचा वाटा सर्वांत मोठा राहिला असून, नागपुरच्या सामन्यात शतक तर दिल्लीतील सामन्यात नाबाद अर्धशतक झळकावून त्याने पाहुण्यांच्या तोंडचे पाणी पळविले आहे. त्याचा हा धडाका यापुढेही कायम राहिला आणि सेहवाग-सचीन-युवराज या त्रिमूर्तींची त्याला चांगली साथ लाभली तर भारत ही मालिका तर जिंकेलच पण जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानीही पोचेल. आत्तापर्यंतच्या तीन सामन्यात सचीन-सेहवान ही जोडी पूर्णपणे फ्लॉप गेली आहे, अर्थात त्यांचे पास्ट रेप्युटेशन इतके जबरदस्त आहे की आणखी काही काळ तरी त्यांचे संघातील स्थान कायम राहील हे निश्चित. हे दोघे आणि हरभजनसिंग वगळता अन्य भारतीय खेळाडू मात्र उत्तम खेळ करीत असून, संघाच्या एकूण भवितव्याच्या दृष्टीने ही गोष्ट निश्चितच स्वागतार्ह मानावी लागेल."**




महत्वपूर्ण सामन्यानंतर झालेली भारत-ऑस्ट्रेलिया लढत पावसामुळे अनिर्णित राहिली आणि मग शेवटच्या वेस्ट इंडिजविरुद्ध साखळी सामन्यात तसे काही महत्वच राहिले नाही. भारताने तो सामना सहज जिंकला. पण तोवर त्याचे स्पर्धेतील आव्हान मात्र संपले होते.

ट्वेंटी ट्वेंटीच्या विश्वकरंडक स्पर्धेप्रमाणे याही स्पर्धेत भारतीय संघ प्राथमिक फेरीतच बाद झाल्याने आता नाही म्हटले तरी धोनी, सचिन, राहुल, रैना अशा साऱ्याच बड्या खेळाडूंचे 'रेप्युटेशन' धोक्यात आले आहे. अर्थात यावेळी युवराजसिंग, सेहवाग व झहीरखान हे तीन सुपरस्टार्स दुखापतग्रस्त असल्याने स्पर्धेत खेळू शकले नाहीत, हेही लक्षात घेतले पाहिजे.

या स्पर्धेत 'डार्क हॉर्स' ठरले ते न्युझीलंड व इंग्लंडचे संघ. त्यापैकी इंग्लीश संघ नुकताच मायदेशात झालेली ऑस्ट्रेलियाविरुद्धची सात सामन्यांची मालिका ६-१ अशी हरला होता तर कर्णधार व्हिटोरी वगळता न्युझीलंडचा बहुतेक सारा संघ दुखापतग्रस्त होता. परंतु द. आफ्रिकेत दाखल झाल्यावर या दोन्ही संघांनी हुशारीने खेळत स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली आणि 'स्लो बट स्टेडी विन्स द रेस' या वचनाचा प्रत्यय रसिकांना दिला. इंग्लंडची कामगिरी सरस ठरण्यात कर्णधार स्ट्रॉस, कॉलिगवुड, ओवैस शहा व नवा यष्टीरक्षक यांच्या झुंझार खेळाचा मोठा वाटा राहिला तर न्युझीलंडची कमान चढती राखली ती व्हिटोरी, शेन बॉड, इलियट व मॅक्लम या

अनुभवी चौकडीने. अर्थात उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाचा सामना करताना मात्र सर्वच इंग्लीश खेळाडू 'फ्लॉप' गेले आणि पॉटिंग व त्याच्या सहकाऱ्यांनी ती लढत चक्क नऊ गडी राखून जिंकली. खुद्द पॉंटिंग व वॅटसन यांची दणकेबाज नाबाद शतक हे त्या सामन्याचे वैशिष्ट्य ठरले.

दुसऱ्या उपांत्य सामन्यात न्युझीलंडची गाठ पडली ती पाकिस्तानशी. खरे तर पाकने तेथे ९ बाद २२६ अशी समाधानकारक धावसंख्या रचली होती, परंतु इलियट (७५) व व्हिटोरी (नाबाद ४१) यांच्या समयसुचक खेळाच्या बळावर न्युझीलंडने विजयाचे लक्ष्य पाच गडी गमावूनच गाठले. हा पराभव पाकिस्तानच्या इतका जिव्हारी लागला की तेथील अनेक बड्या नेत्यांनी त्याचे खापर 'मॅच फिक्सिंग' वर फोडले. खेळ म्हटला की हार-जित ही आलीच, या मूलभुत तत्त्वाचा विसर पडल्यामुळे निर्माण करण्यात आलेल्या या वादंगाची परिणती अखेर कर्णधार युनिसखानच्या राजीनाम्यात झाली होती, आता ते वादळ शमले असले तरी पाकिस्तानच्या खेळाडूंचा अवसानघातकी खेळ आणि त्या संघातील बेदिली याचे अभद्र दर्शन मात्र साऱ्या जगाला पुनःश्च घडले आहे.

चॅम्पियन करंडक स्पर्धेचा ऑस्ट्रेलिया विरुद्ध न्युझीलंड हा अंतिम सामना तसा एकतर्फीच झाला आणि तो सहा गडी राखुन जिंकत पॉंटिंगने आपलाच संघ 'विश्वविजेता' आहे हे निर्विवादपणे सिद्ध करून दिले. उपांत्यप्रमाणे याही सामन्यात अष्टपैलु सलामीवीर वॅटसनने झकास शतक ठोकले आणि १९९६ च्या विश्वकरंडक स्पर्धेत श्रीलंकेचा 'मॅड मॅक्स' अरविंद डिसील्वा याने गाजविलेल्या पराक्रमाची पुनरावृत्ती केली. मायकेल क्लार्क, हॅडिन व ब्रॅकन हे नेहमीचे हुकुमी खेळाडू संघात नसतांना 'चॅम्पियन करंडक' पटकावून पॉन्टिंगने एक नवा इतिहास घडविला आहे, असे म्हणणे अजिबात अतिशयोक्तीचे ठरू नये. आता तो व त्याचे सहकारी आपल्या विजययात्रेच्या मार्गातला शेवटचा अडथळा ओलांडण्यासाठी पुन्हा एकदा भारतात आले आहेत. येथे ते कसे खेळतात यावरच त्यांच्या संघाचे जागतिक क्रमवारीतील अव्वल स्थान अवलंबून राहील. आत्तापर्यंत या मालिकेतील तीन सामने झाले असून, त्यापैकी एक ऑस्ट्रेलियाने अगदी निसटत्या फरकाने (४ धावांनी) तर दोन भारताने अगदी दणदणीतरीत्या जिंकले आहेत. भारताच्या दोन्ही विजयांत कर्णधार धोनीचा वाटा सर्वांत मोठा राहिला असून, नागपुरच्या सामन्यात शतक तर दिल्लीतील सामन्यात नाबाद अर्धशतक झळकावून त्याने पाहुण्यांच्या तोंडचे पाणी पळविले आहे. त्याचा हा धडाका यापुढेही कायम राहिला आणि सेहवाग-सचीन-युवराज या त्रिमूर्तींची त्याला चांगली साथ लाभली तर भारत ही मालिका तर जिंकेलच पण जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानीही पोचेल. आत्तापर्यंतच्या तीन सामन्यात सचीन-सेहवान ही जोडी पूर्णपणे फ्लॉप गेली आहे, अर्थात त्यांचे पास्ट रेप्युटेशन इतके जबरदस्त आहे की आणखी काही काळ तरी त्यांचे संघातील स्थान कायम राहील हे निश्चित. हे दोघे आणि हरभजनसिंग वगळता अन्य भारतीय खेळाडू मात्र उत्तम खेळ करीत असून, संघाच्या एकूण भवितव्याच्या दृष्टीने ही गोष्ट निश्चितच स्वागतार्ह मानावी लागेल.

## दणका 'चॅम्पियन्स लीग'

ट्वेंटी ट्वेंटी क्रिकेटला व्यावसायिकतेचे परमोच्च परिणाम प्राप्त करून देणाऱ्या इंडियन प्रिमियर लीगची तिसरी स्पर्धा भारतात नुकतीच पार पडली. दिल्ली, बंगळूर व हैदराबाद या तीन ठिकाणच्या मैदानांवर खेळल्या गेलेल्या या स्पर्धेत दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, इंग्लंड, न्युझीलंड व वेस्ट





इंडिजमधील ९ अव्वल क्लबचे संघ आणि आयपीएलचे डेक्कन चार्जर, दिल्ली डेअर डेव्हील्स व रॉयल चॅलेंजर हे तीन बडे संघ यांचा सहभाग होता. त्यात आयपीएलच्या तिन्ही संघांमध्ये ॲडम गिलख्रिस्त, अनील कुंबळे, विरेंद्र सेहवाग, ॲण्ड्रयु सायमंडस्, ग्लेन मॅकग्रा आदि महान खेळाडुंचा समावेश असल्याने त्यापैकीच कोणाचा तरी प्रबळ संघ विजेतेपदाचा मानकरी ठरेल, अशी सर्वसाधारण अपेक्षा होती. परंतु प्रत्यक्षात त्यापैकी एकही संघ उपांत्यफेरीही गाठू शकला नाही, ती कामगिरी बजावली ती कॅटिचचा न्यु साऊथ वेल्स जस्टिन लँगरचा व्हिक्टोरिया बुशरेंजर, डरेन गंगाचा त्रिनिदाद ॲन्ड टोबॅगो आणि द. आफ्रिकेचा केप कोब्राज या चार संघांनी! त्यापैकी त्रिनिदाद-टोबॅगो संघात नवोदित विंडीज खेळाडूंचा भरणा असल्याने इतर तीन संघांच्या तुलनेत कागदावर तरी तो संघ दुबळाच वाटत होता, परंतु त्यांच्या किरॉन पोलार्ड या नव्या चेहेऱ्याने या संपूर्ण स्पर्धेत अशी काही घणाघाती फलंदाजी केली की बस्स ! कॅलिप्सो किंग' व्हिव्हियन रिचर्डस्च्या झंझावाती खेळाच्या रोमहर्षक आठवणी जाग्या करीत पोलॉर्डने आपल्या संघाला स्पर्धेची अंतिम फेरी अगदी आरामात गाठून दिली. अर्थात तेथे मात्र कॅटिच-ह्युजेस, वॉर्नर आणि ब्रेट ली या ऑस्ट्रेलियन खेळाडूंपुढे त्या संघाची फारशी मात्रा चालली नाही. आणि 'चॅम्पियन्स लीग' चे विजेतेपद न्यु साऊथ वेल्सने पटकावले. आयपीएलच्या पहिल्या दोन स्पर्धा शेन वॉर्न व ॲडम गिलख्रिस्त या ऑस्ट्रेलियन खेळाडूंच्या नेतृत्वाखालील संघांनी जिंकल्या होत्या. त्यांची परंपरा या तिसऱ्या स्पर्धेत त्यांचा देशबांधव कॅटिचने कायम राखली आणि कितीही चढ-उतार झाले तरी जागतिक क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाचे खेळाडूच अव्वल आहेत, हे पुन्हा एकवार प्रत्ययास आणून दिले.

## इराणी करंडक शेष भारताकडेच

ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात नागपुरमध्ये इराणी करंडकासाठी सेहवागच्या नेतृत्वाखालील शेष भारत आणि मुंबई यांच्यात लढत झाली. दुखापतीमुळे गेले ३-४ महिने क्रिकेटच्या मैदानापासून दूर राहावे लागलेल्या सेहवागचे पुनरागमन हे या सामन्याचे मुख्य आकर्षण होते, परंतु पहिल्या डावात चक्क शून्यावर बाद होऊन त्याने सर्वांचीच निराशा केली. अर्थात फलंदाज म्हणून तो 'फेल' गेला तरी श्रीसंत व मुनाफ पटेलच्या भेदक गोलंदाजीमुळे कर्णधार म्हणून अखेर विजेतेपदाची माळ मात्र त्याच्याच गळ्यात पडली. पावसाळी हवेचा फटका बसलेल्या या सामन्यात शेष भारताच्या २६० धावसंख्येचा पाठलाग करतांना मुंबईचा संघ २३० धावांतच बाद झाला आणि मग ही पहिल्या डावात मिळालेली आघाडीच शेष भारतास सलग पाचव्या वर्षी इराणी करंडकांचा मानकरी बनवून गेली. शेष भारताच्या अभिनव मुकुंदचे शतक आणि मुरली विजय (९१) व मनोज तिवारी (नाबाद ८०) यांनी त्याला दिलेली सुरेख साथ ही या सामन्याची वैशिष्ट्ये ठरली. परंतु त्याचा आनंद घेत असतांना नागपुरकरांना श्रीसंथच्या बेलगाम, अखिलाडू वर्तनाची चुणूकही पाहायला मिळाली. यापूर्वी आयपीएल स्पर्धेत हरभजनसिंगकडून 'मुखभंग' झाल्यानंतरही हा 'हॉट हेडेड' खेळाडू बदललेला नाही, हेच खरे. आता मुंबईच्या धवल कुलकर्णीस मैदानावर शिवीगाळ केल्याबद्दल श्रीसंथला एक लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला असून, यापुढेही त्याचे वर्तन सुधारले नाही तर भारतीय क्रिकेटचे दरवाजे त्याच्यासाठी कायमचे बंद होण्याची शक्यता आहे.

## गंभीर, धोनीस 'आयसीसी पुरस्कार'

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेतर्फे दरवर्षी 'सर्वोत्तम खेळाडू पुरस्कार' दिले जातात. यंदा त्या यादीत सलामीवीर गौतम गंभीर (सर्वोत्तम कसोटी खेळाडू) व कर्णधार महेंद्रसिंह धोनी (सर्वोत्तम वन डे खेळाडू) दोन भारतीयांना स्थान मिळाले. एवढेच नव्हे तर 'वर्ल्ड इलेव्हन'च्या कर्णधारपदाची माळही



धोनीच्याच गळ्यात पडली. दरम्यान 'प्लेअर ऑफ द इयर' पुरस्कार तर सर्वोत्कृष्ट पंच हा किताब पाकिस्तानचे आलम दार यांना मिळाला.

## जागतिक क्रमवारीत विजेंदर अव्वल



धोनी व गंभीरमुळे भारताची क्रिकेटची शान उंचावत असतांना 'ऑलिम्पिकचा वीर' मुष्टीयोद्धा विजेंदरसिंहने जागतिक क्रमवारीत (७५ किलो वजनी गट) अव्वल स्थान पटकावून 'हम भी कुछ कम नही' हे दाखवून दिले आहे. जागतिक क्रमवारीत एखाद्या भारतीय मुष्टीयोध्याची वर्णी आणि तीही सर्वोच्च स्थानी- लागण्याची ही पहिलीच वेळ आहे.

## सानिया मिर्झाचे किंचीत यश

लॉन टेनिसमध्ये भारताचा ध्वज फडकता ठेवण्याची कामगिरी गेली २-३ वर्षे सानिया मिर्झा बजावत असली तरी कोणत्याही स्पर्धेत तिची मजल दोन फेऱ्यांपुढे जात नाही, असा अनुभव आहे. यावेळी 'ओसाका ओपन' स्पर्धेत मात्र अन्य बड्या खेळाडूंच्या अनुपस्थितीचा लाभ उठवून तिने चक्क उपांत्य फेरी गाठली. ही आगेकुच करतांना शहारा पीर व मारिया बार्टोली या सरस प्रतिस्पर्ध्यांवर मात करण्यात तिने यश मिळविले पण अखेर इटलीच्या फ्रान्सिस्का शियावोनीने तिला अंतिम फेरीत मात्र पोच दिले नाही. ही उपांत्य लढत सानियाने ६-२, ६-१ असी गमावली.

दरम्यान यंदा प्रथमच जागतिक टेनिस फेडरेशनचा 'क्राऊन ज्वुवेल इव्हेंट' हा दर्जा लाभलेल्या चायना ओपन स्पर्धेत पुरुष गटाचे विजेतेपद नोवाक जोकोविकने तर महिला गटाचे विजेतेपद फ्रेंच ओपन विजेत्या स्वेतलाना कुत्झीनेत्सोवाने जिंकले.



या स्पर्धेत टेनिसचा बादशहा रॉजर फेडरर उतरला नव्हता, त्यामुळे त्याचा वारसदार बनू पाहाणाऱ्या रॅफेल नदालला चांगली संधी होती. परंतु त्याचे आव्हान स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीतच क्रोएशियाच्या मार्टिन क्लिकने संपुष्टात आणले. अखेर हाच क्लिक अंतिम लढतीत जोकोकिकडून ६-२,७-६ असा पराभूत झाला, पण त्याच्या रूपाने एका नव्या जिद्दी, गुणी खेळाडूचा उदय आंतरराष्ट्रीय टेनिसमध्ये होत आहे, हे निश्चित.

## डेविडेंकोचे पुनरागमन

'चायन ओपन' पाठोपाठ झालेल्या शांघाय मास्टर्स स्पर्धेत रशियाचा निकोलाय डेविडेंको अजिंक्य ठरला. त्याने जोकोविकला उपांत्य तर नदालला अंतिम फेरीत नमविले. गेले सहा महिने डेविडेंको दुखापतींमुळे आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धात खेळू शकला नव्हता. आता त्याच्या विजयी पुनरागमनामुळे पुरुष गटातील चुरस अधिकच वाढणार आहे.

## द्रविडला पुन्हा 'डच्च्यु'

भारतीय क्रिकेटची भिंत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अनुभवी राहुल द्रविडला पुन्हा एकवार एक दिवसीय सामन्यांसाठीच्या संघातून काढण्यात आले आहे. 'चॅम्पियन करंडक स्पर्धेत' भारताच्या पदरी जे दारूण अपयश आले, त्याचे खापर कोणाच्या तरी डोक्यावर फोडणे तसे गरजेचेच झाले होते. त्यासाठी प्रथम राहुलची आणि नंतर क्षेत्ररक्षण व गोलंदाजी विभागाचे प्रशिक्षक रॉबिन सिंग व वेंकटेश प्रसाद



यांची निवड करण्यात आली. सभ्यतेचे सारे संकेत झुगारून या गुणवान त्रिमूर्तींच्या हाती 'निरोपाचे नारळ' देणाऱ्या बीसीसीआयने संघाचे मुख्य मार्गदर्शक गॅरी कर्स्टन यांची 'महागडी सेवा' मात्र बिनदिक्कतपणे पुढे चालू ठेवली आहे. खरे तर, संघाच्या अपयशाची सर्वाधिक जबाबदारी कर्स्टन महाशय व कर्णधार धोनी यांनीच घेणे अपेक्षित होते. त्यांच्यावर काही कारवाई नाही, मग द्रविड-रॉबिन-प्रसाद यांनाच बळीचा बकरा का केले ? अर्थात अशा अडचणीच्या प्रश्नाचे उत्तर मिळण्याची सुतराम शक्यता नाही. त्यात आला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत सरस कामगिरी झाल्याने तर कालचे 'झिरो' पुन्हा 'हिरो' झाले आहेत. हा सर्व उद्वेगजनक प्रकार पाहिला की अन्य काही नाही पण 'ज्याच्या हाती ससा तो पारधी' या म्हणीचा गर्भितार्थ मात्र चांगलाच लक्षात येतो.

## डोपिंगग्रस्त वेटलिफ्टर्स



शैलजा पुजारी

आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धांमध्ये सामान्यतः थोडे फार चमकतात ते आपले वेटलिफ्टर्सच. परंतु उत्तेजक द्रव्यांच्या सेवनाचे (डोपिंग) आरोप एक नाही, दोन नाही तर चक्क डझनभर वेटलिफ्टर्सवर सिद्ध होतात तेव्हा मात्र आमचे क्रीडापटू व त्यांचे मार्गदर्शक नेमके चालले आहेत तरी कोठे, असा प्रश्न पडतो. राष्ट्रकुल स्पर्धा अगदी तोंडावर आलेल्या असतांना शैलजा पुजारी, प्रियदर्शिनी व विकी बट्टा या तीन संभाव्य विजेत्यांसह एकूण आठ वेटलिफ्टर्स उत्तेजक द्रव्यांचे सेवन करीत असल्याचे धक्कादायक प्रकरण नुकतेच उजेडात आले आहे. भारतीय क्रीडाक्षेत्राची प्रतिमा काळवंडणाऱ्या या बदनाम खेळाडूंवर आता कदाचित निलंबनाची वगैरे कारवाई होईलही, पण त्यामुळे झालेल्या एकूण नुकसान कसे भरून निघणार?

## युवा क्रिकेटपटूंच धक्कादायक हत्या



१५ वर्षाखालील, १९ वर्षाखालील आणि नुकताच २२ वर्षांखालील खेळाडूंच्या भारतीय संघातून खेळलेल्या गगनदीपसिंग या युवा क्रिकेटपटूची गेल्या पंधरवड्यात मीरत येथे हत्या झाली. ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावरून नुकताच परतलेला हा डावरा फिरकी गोलंदाज सी. के. नायडू करंडक स्पर्धे साठी तेथे गेला होता. कबाबविक्री करणाऱ्या एका दुकानासमोर उभा असतांना कोण्या बेछूट, संतप्त ग्राहकाने अचानकपणे केलेल्या स्वैर गोळीबारात गगनदीपला आपले प्राण गमवावे लागले. त्याच्या दुदैवी मृत्युमुळे भारतीय क्रिकेटक्षेत्राने एक चमचमता उगवता तारा गमावला आहे, यात शंकाच नाही.

## खो खोच्या द्रोणाचार्यांचा अस्त

खो खो सारख्या दुर्लक्षित पण अस्सल देशी खेळाच्या विकासासाठी आपले सारे आयुष्य वेचलेले ज्येष्ठ क्रीडासंघटक गोपाळराव फडके नुकतेच कालवश झाले. ॲथलेटिक्सच्या अनेक क्रीडाप्रकारांवर असाधारण प्रभुत्व असलेले गोपाळराव खरे रमले ते मात्र खो खोतच. आपल्या अनेक गुणवान शिष्यांच्या माध्यमातून त्यांनी हा खेळ जगाच्या काना-कोपऱ्यात पोचविला. त्यांच्या या असाधारण कार्याचा गौरव म्हणून शासनाने त्यांना 'पद्मश्री' व द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित केले होते. हा सन्मान लाभलेले ते आजवरचे एकमेव खो खो अग्रणी होत, ही गोष्ट त्यांचे त्या क्षेत्रातील एकमेवद्वितीय स्थान सिद्ध करण्यास पुरेशी आहे.

# अखेर बाजी मारली ऑस्ट्रेलियानेच...!

रिकी पॉन्टिंगच्या नेतृत्वाखालील ऑस्ट्रेलिया संघाचा 'अश्वमेधी वारू' मायदेशात ठाणबंद करून आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या क्रमवारीत अव्वल स्थानी येण्याचे महेंद्रसिंह धोनी व त्याच्या लढाऊ (?) सहकाऱ्यांचे स्वप्न याहीवेळी उधळले गेले आहे. हा लेख लिहीत असतांना गुवाहाटीचा सहावा एकदिवसीय सामना ऑस्ट्रेलियाने अगदी सहज जिंकल्याचे वृत्त हाती आले असून, या विजयामुळे त्या संघास चालू मालिकेत ४-२ अशी विजयी आघाडीही मिळाली आहे.

खरे तर, ही मालिका खेळण्यासाटी ऑस्ट्रेलियाचा संघ भारतात दाखल झाला तेव्हा उपकर्णधार मायकेल क्लार्क, यष्टीरक्षक-फलंदाज हॅडिन व डावरा जलदगती गोलंदाज ब्रँकन ही भरवशाची त्रिमूर्ती बरोबर नसल्यामुळे पॉंटिंग तसा चांगलाच अडचणीत होता. त्याचे दुर्दैव असे की, मालिकेस प्रारंभ झाल्यानंतर जलदगती गोलंदाज ब्रेट ली व पीटल सीडल अष्टपैलू जेम्स होप्स व बदल यष्टीरक्षक टीम पेन या आणखी चार खेळाडूंना दुखापतग्रस्त होऊन दौरा अर्ध्यावर सोडावा लागला. परंतु त्याचा लाभ होण्यापूर्वी त्यांना सचीनच्या बॅटचा हिसका मात्र अनुभवावा लागला. अनेकदृष्ट्या अभुतपूर्व व संस्मरणीय म्हणावी अशी ती खेळी करतांना सचीनने तब्बल १७५ धावांचा डोंगर एकहाती उभा केला आणि एकदिवसीय सामन्यांतील १७ हजार धावांचे शिखरही पादाक्रांत केले. परंतु त्यापासून काही बोध घेऊन आपल्याही खेळाचा दर्जा जमेल तेवढा उंचावण्याऐवजी अन्य भारतीय खेळाडू अधिकच ढेपाळले आणि पुढच्या गुवाहाटी येथील निर्णायक महत्वाच्या सामन्यात फक्त १७० धावांत तंबूत परतले. अर्थात ही धावसंख्याही भारत गाठू शकला ती नवोदित रविंद्र जडेजा व



# डेव्हीड शेफर्ड यांचे निधन



आंतरराष्ट्रीय क्रिकेटक्षेत्रावर आपला स्वतःचा असा एक खास ठसा उमटविणारे ज्येष्ठ पंच डेव्हीड शेफर्ड यांचे नुकतेच निधन झाले. 'लॉरेल हार्डी' जोडगोळीतील गंमत्या, गोलमटोल लॉरेलशी साम्य असलेला हा बुजुर्ग गेला काही काळ कॅन्सरसारख्या दुर्धर व्याधीशी झुंजत होता. आपल्या कारकीर्दीची सुरुवात ग्लुसेस्टरशायरचा एक गुणी खेळाडू म्हणून करणाऱ्या शेफर्ड यांनी पंच म्हणून आंतरराष्ट्रीय क्रिकेट मंचावर पहिले पाऊल टाकले ते १९८३ च्या विश्वकरंडक स्पर्धेत! त्यानंतरच्या पावशतकात त्यांनी ९२ कसोटी व १७२ एक दिवसीय सामन्यांचे सुत्रसंचालन केले आणि आपल्या निष्पक्षपाती निर्णयक्षमतेच्या बळावर जगभरचे जाणकार व खेळाडूंची वाहवा मिळविली. त्यांच्या निधनामुळे क्रिकेटच्या मैदानावरील एक प्रसन्न पण प्रगल्भ व्यक्तिमत्त्व कायमचे हरपले आहे.



जिद्दी प्रविणकुमार यांच्या अर्धशतकांमुळेच ! त्यांनी या धावा केल्या नसल्या तर धोनी आणि कंपनी पाऊणशे-शंभर धावांचा पल्लाही गाठू शकली नसती. सचीनने हैदराबादेत उभ्या केलेल्या धावांच्या डोंगराखाली सेहवाग-गंभीर-युवराज-रैना आणि खुद्द धोनी हे भारतीय संघाचे नवे पाच पांडव गुदमरल्यामुळे ही लाजिरवाणी स्थिती झाली काय, हे कळायला मार्ग नाही. परंतु ऑस्ट्रेलियाच्या 'तोडीस तोड' बनायचे - (अगदी 'क्लब स्टॅंडर्ड'च्या अननुभवी खेळाडूंचा भरणा असलेल्या सध्याच्या संघाच्याही) तर आपल्या खेळाडूंना आणखी बरेच श्रम अवाजवी मोह सोडून खूप काही शिकावे लागणार आहे, निश्चित. क्रिकेट हा अखेर सांघिक खेळ आहे, सचीन सारख्या एखाद्या बहाद्दरच्या नवनव्या वैयक्तिक विक्रमांची झालर लाभल्याने त्याची रंगत वाढत असली तरी अखेर अंतिम जया-पराजयाच्या दृष्टीने त्याचे महत्व तसे मर्यादितच असते. आपल्या सर्वांना-त्यात खेळाडूही आले आणि तमाम कोटी-कोटी क्रिकेटशौकिनही- नेमके त्याचेच भान न राहिल्यामुळे मायदेशातील आणखी एक महत्त्वाची मालिका गमावण्याची नामुष्की आपल्या संघावर ओढविली आहे. आधी म्हटल्याप्रमाणे पॉंटिंग, हसी व वॅटसन ही त्रिमूर्ती वगळता भारतात खेळलेले बाकी सर्व ऑस्ट्रेलिया खेळाडू अगदीच नवशिके होते, त्यांना बरोबर घेऊन खेळणे म्हणजे पॉंटिंगच्या नेतृत्वगुणांची सत्वपरीक्षाच होती. परंतु त्यात तो केवळ उत्तम प्रकारे उत्तीर्णच झाला नाही तर "When the going gets tough, the tough gets going" या वचनाचा सुखद प्रत्ययही त्याने तुम्हा-आम्हाला दिला.

*Three cheers foor osis !!*
*Hats off to popting*
*and his men !!*

■■■